दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ७ वे अंक -३२ | शनिवार दि.१० ऑक्टोबर २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-7th | Issue- 32 | Saturday, Dt.10 October 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# करपलेली पिके,आटलेल्या विहिरी अन् शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील चिंता केंद्रीय पथकाने अनुभवली.. !

## दुष्काळाची दाहकता जाणून घेण्यासाठी केंद्रीय पथकाचा रात्री नऊपासून दुसऱ्या दिवशी चारपर्यंत अखंड दौरा..






### शेताच्या बांधापर्यंत, तीन जिल्ह्यांत पीक नुकसानीची पाहणी, शेतकरी व महिला शेतमजुरांशी संवेदनशील संवाद !







छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी

शेतात पेरलेले बी हे केवळ पीक नसते त्यात शेतकऱ्याच्या वर्षभराच्या कष्टांची, कुटुंबाच्या अपेक्षांची आणि उद्याच्या जगण्याची स्वप्ने असतात. मात्र, पावसाने दीर्घकाळ पाठ फिरवली की पिकांसोबत ही स्वप्नेही कोमेजून जातात. करपलेली पिके, आटलेल्या विहिरी, कोरडी नदीपात्रे आणि पिण्याच्या पाण्यासाठी करावी लागणारी धावपळ मराठवाड्यातील दुष्काळाची हीच दाहकता केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथकाने प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन अनुभवली. केवळ आकडेवारी आणि अहवालांपुरते दुष्काळाचे आकलन मर्यादित न ठेवता शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचून त्यांच्या अडचणी जाणून घेण्याचा प्रयत्न या दौऱ्यात करण्यात आला.

गुरुवार, दि. ८ ऑक्टोबर रोजी रात्री नऊ वाजता विभागीय आयुक्तालयात सुरू झालेला आढावा आणि त्यानंतरचा प्रत्यक्ष पाहणी दौरा शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी दुपारी चार वाजेपर्यंत सुरू होता. विभागीय आयुक्तालयातील सविस्तर सादरीकरणानंतर छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांतील दुष्काळग्रस्त भागांची पाहणी करून पथकाने पीक नुकसान, पाणीटंचाई आणि शेतकऱ्यांच्या अडचणींची प्रत्यक्ष माहिती घेतली. विशेष म्हणजे, पऱ्हाटी शेतात काम करणाऱ्या कापूस उत्पादक महिला शेतमजुरांशी संवाद साधण्यासाठी पथकाने ताफा थांबविला. महिलांची आस्थेवाईकपणे विचारपूस करून त्यांच्या अडचणी जाणून घेण्यात आल्या. दुष्काळाचा परिणाम पिकांसोबतच मजुरांच्या रोजगारावर आणि कुटुंबांच्या जगण्यावरही होत असल्याची जाणीव या संवादातून अधोरेखित झाली.

आकडेवारीपासून प्रत्यक्ष वास्तवापर्यंत

केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथकाचे नेतृत्व कृषी व शेतकरी कल्याण विभागाचे संयुक्त सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मुक्तानंद अग्रवाल यांनी केले. पथकात महालनोबिस राष्ट्रीय पीक पूर्वानुमान केंद्राचे उपसंचालक सुनील कुमार दुबे, नीती आयोगाचे सल्लागार डॉ. जसपाल सिंग आणि पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या पशुधन अधिकारी डॉ. साक्षी भदौरिया यांचा समावेश होता. राज्याचे कृषी सचिव परिमल सिंग हेही दौऱ्यात सहभागी होते.

गुरुवारी रात्री विभागीय आयुक्तालयात विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी पथकाला मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचे सविस्तर सादरीकरण केले. पर्जन्यमानातील तूट, खरीप पिकांची स्थिती, धरणांतील पाणीसाठा, भूजल पातळी, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, चारा आणि रोजगाराच्या प्रश्नांबाबतची माहिती यावेळी मांडण्यात आली. या बैठकीला जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. दूरदृश्यप्रणालीद्वारे विभागातील आठही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी सहभागी झाले होते.

विभागातील आठ जिल्ह्यांतील ७६ तालुक्यांमध्ये खरीप पेरणीचे क्षेत्र सुमारे ५२ लाख हेक्टर असून पावसाच्या दीर्घ खंडामुळे पिकांच्या वाढीवर आणि संभाव्य उत्पादनावर

पान २ वर...

**प्रशासनाच्या उपाययोजना, शेतकऱ्यांना अपेक्षा**

दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन प्रशासनाकडून पिण्याच्या पाण्याचे नियोजन, टँकरद्वारे पुरवठा, आवश्यकतेनुसार विहिरींचे अधिग्रहण, चारा उपलब्धता आणि रोजगार हमीच्या कामांचे नियोजन करण्यात येत आहे. विभागीय आयुक्तालयातील बैठकीत या उपाययोजनांची माहिती केंद्रीय पथकाला देण्यात आली. प्रत्यक्ष पाहणीदरम्यान शेतकऱ्यांनी पीक नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे, नुकसानभरपाई, आर्थिक मदत आणि पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

# ज्येष्ठ अभिनेते पद्मश्री नाना पाटेकर यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतले नाना पाटेकर यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन, कुटुंबीयांचे केले सांत्वन






पुणे (जिमाका वृत्तसेवा)

ज्येष्ठ अभिनेते पद्मश्री नाना पाटेकर यांच्या पार्थिवावर आज डोणजे येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात नाना पाटेकर यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेऊन कुटुंबीयांची भेट घेत सांत्वन केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत दादा पाटील, उद्योगमंत्री उदय सामंत, राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी नाना पाटेकर यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेऊन पुष्पचक्र अर्पण करत श्रद्धांजली वाहिली.

यावेळी खासदार सुनील तटकरे, माजी मंत्री अर्जुन खोतकर, आमदार सदाभाऊ खोत, आमदार भाई जगताप, हेमंत पाटील, अनिकेत तटकरे, गोपीचंद पडळकर, अमित गोरखे, भिमराव तापकीर, आदर्श गाव संकल्प व प्रकल्प समितीचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार,

पान २ वर...

# जिल्ह्यात अवैध पाणी उपशावर प्रशासनाची धडक कारवाई




## वडवणीत गुन्हा तर धारूर पोलीस ठाण्यात 'एनसी' दाखल

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांवरून होत असलेल्या अवैध पाणी उपशाची प्रशासनाने अत्यंत गंभीर दखल घेतली आहे. उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्प (वडवणी) आणि आरणवाडी साठवण तलाव (केज) येथे प्रशासनाने पोलिसांच्या मदतीने संयुक्त कारवाई केली. यावेळी अवैध मोटारी काढण्यास नकार देत शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्यांवर वडवणी येथे एफआयआर (ऋखठ) तर धारूर पोलीस ठाण्यात 'एनसी' दाखल करण्यात आली आहे.

दिनांक ०७ ऑक्टोबर रोजी जलसंपदा विभाग आणि पोलीस यांच्या

पान २ वर...

# बीड - जाटनांदुर सायंकाळची बससेवा तात्काळ सुरू करा

बीड । प्रतिनिधी

बीड आगारातून सायंकाळी ५.३० वाजता सुटणारी बीड-जाटनांदुर बससेवा गेल्या तीन दिवसांपासून कोणतीही पूर्वसूचना न देता बंद करण्यात आल्याने जाटनांदुर, डोंगरकिन्ही, गारमाथा, निरगुडी, तगारा व परिसरातील विद्यार्थी, महिला, नोकरदार, शेतकरी आणि सर्वसामान्य प्रवाशांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. त्यामुळे ही बससेवा तात्काळ आणि कोणत्याही परिस्थितीत पूर्ववत सुरू करावी, अशी ठाम मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य ड. प्रकाश कवठेकर यांनी केली आहे.

सायंकाळी शाळा व महाविद्यालये सुटल्यानंतर विद्यार्थ्यांना घरी परतण्यासाठी ही बस अत्यंत आवश्यक आहे. बस बंद करून विद्यार्थ्यांना खासगी वाहनांचा महागडा आणि असुरक्षित पर्याय स्वीकारण्यास भाग पाडणे अत्यंत गंभीर बाब आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आणि सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असताना प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करू नये.

बससेवा बंद असल्याने विद्यार्थ्यांसह महिला व ज्येष्ठ नागरिकांना सायंकाळच्या वेळी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. खासगी वाहतूक उपलब्ध नसल्यास क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी घेणाऱ्या वाहनांचा आधार घ्यावा लागण्याची शक्यता असून, त्यामुळे प्रवाशांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो.एसटी महामंडळ ही जनतेची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आहे. नफ्या-तोट्याच्या कारणांपेक्षा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शिक्षण, नागरिकांची सुरक्षितता आणि त्यांच्या दैनंदिन प्रवासाचा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. त्यामुळे या मार्गावरील बससेवा बंद ठेवण्याचा निर्णय तातडीने मागे घेण्यात यावा.

# अंबाजोगाई जि.प.बां.उ.वि.उपअभियंता राजेंद्र काळे यांच्या काळ्या कारनाम्यांची चौकशी होणार का...?

## सीईओ जतीन रहेमान साहेब, उघडा डोळे बघा नीट आणि व्हा जरा धीट

**अंबाजोगाई/सुनील सीरसाट**

अंबाजोगाई येथील जि.प.बां.वि.उपअभियंता कार्यालयास उपअभियंता म्हणून राजेंद्र काळे रुजू झाल्यापासून या कार्यालयात मोठ्या प्रमाणात आनागोंदी कारभार करण्यात आला असून त्याची चौकशी होणे नितांत गरजेचे आहे.

अंबाजोगाई येथील जि.प.बां.का.बीडचे उपअभियंता कार्यालय हे सातत्याने वादाच्या भोवऱ्यात राहिलेले आहे. परंतु अलीकडच्या काळात या कार्यालयाचे मुख्य अधिकारी तथा प्रभारी उपअभियंता म्हणून राजेंद्र काळे यांनी पदभार घेतल्यापासून तर या कार्यालयाला चांगलीच घरघर लागली असून काळे यांनी आपल्या मनमानीचा चांगलाच सपाटा लावल्याने तालुक्यातील अनेक ग्रामपंचायती, विविध एजन्सी-सोसायटी-बेकार अभियंताच्या माध्यमातून छोटी-मोठी गुत्तेदारी करणारे गुत्तेदार कमालीचे वैतागून गेलेले आहेत. एकीकडे लाडक्या बहिणीमुळे आर्थिक दृष्ट्या हतबल झालेले सरकार कुठल्याही कामाची देयके वेळेत देत नसल्याने मुळातच हैराण असलेल्या गुत्तेदारांना उपअभियंता महाशय राजेंद्र काळे यांनी तर पुरते परेशान करून टाकले आहे.



निधी उपलब्ध असलेली कामे असो की निधी उपलब्ध नसलेली कामे असोत, संबंधित कामांसाठी बंधनकारक एक टक्का (१%) तर वेळप्रसंगी दोन टक्का (२%) टेबला खालची गैररक्कम घेतल्याशिवाय महाशय काळे हे कुठल्याही देयकावर स्वाक्षरी करत नाहीत. अशी ओरड मोठ्या प्रमाणात ऐकावयास मिळत आहे. तेव्हा राजेंद्र काळे यांना नेमका कुणाचा आशीर्वाद आहे.? ते कुणाच्या जोरावर विविध पक्ष-संघटनेच्या कार्यकर्त्यांना आपली मनमानी करत मोठ्या प्रमाणात बेजार करत आहेत..? अशीही चर्चा जागोजागी ऐकावयास मिळत आहे.

शिवाय नुकतेच मैल कामगारांच्या जीपीएफ बाबतीत घडलेल्या ताज्या प्रकरणावरून तर अंबाजोगाई जि.प.बां.उपविभाग पुरता बदनाम झाला असून या प्रकरणात समोर दर्शविलेला भाग वेगळाच असून पडद्यामागचा खेळ वेगळाच आहे. तर पडद्यामागे हा प्रकार घडवणारे अधिकारी-

पान २ वर...

संपादकीय....

# विजयाबाईंचा लाडका 'नान्या' गेला...

नानाच्या करिअरमध्ये विजय तेंडुलकर, विजया मेहता, अरविंद-सुलभा देशपांडे आदींचा वाटा अतिशय मोलाचा मानला जातो. नानाला खऱ्या अर्थाने आपल्या पंखाखाली घेऊन घडवलं, आकार दिला तो अर्थातच विजयाबाईंनी. त्यांच्या स्कूलमधला हा विद्यार्थी त्यांचा प्रचंड लाडका.

नानाच्या करिअरमध्ये विजय तेंडुलकर, विजया मेहता, अरविंद-सुलभा देशपांडे आदींचा वाटा अतिशय मोलाचा मानला जातो. नानाला खऱ्या अर्थाने आपल्या पंखाखाली घेऊन घडवलं, आकार दिला तो अर्थातच विजयाबाईंनी. त्यांच्या स्कूलमधला हा विद्यार्थी त्यांचा प्रचंड लाडका.

गुरुवारी सकाळी सकाळी उन्मेष नाट्यसंस्थेच्या ग्रुपवर कोणी तरी दबक्या स्वरात विचारलं, नानाची बातमी खरी आहे का?. काही क्षण सन्नाटा, त्या ग्रुपवर आणि माझ्या मनातही... त्यानंतर गोव्याला नाना गेल्याची बातमी भसाभस सर्वत्र व्हायरल झाली. अनेकांच्या प्रतिक्रिया येऊ लागल्या. नाना पाटेकर गेला. विजया मेहता यांच्या रंगायन शाळेतला विजयाबाईंचा तगडा, गुणी कलाकार विद्यार्थी गेला. अगोदर विक्रम गोखले, मग स्वतः विजयाबाई आणि आता बाईंचा लाडका 'नान्या' गेला.

खरं तर नाना पाटेकर अवघ्या ७५ व्या वर्षी असा अवेळी गेल्याची बातमी खरोखरच धक्कादायक. नाट्य-चित्रपटसृष्टीला नानाच्या जाण्याचा प्रचंड शॉक बसलाय. नानावर लिहायचं. पण काय? कसं? किती? फार अवघड, फार कठीण. कारण जवळ जवळ गेली पन्नास वर्षे तरी नाना पाटेकर नावाच्या अवलियाने माझ्यासारख्या अनेक रंगकर्मीयांचं जग व्यापलेलं. त्याकाळातली अग्रगण्य आविष्कार ही नाट्यसंस्था - अरविंद - सुलभा देशपांडे - काकडे काका - प्रायोगिक रंगभूमीचा केंद्रबिंदू आधारवड असलेली छबिलदास नाट्यचळवळ, 'आला अडाण्याचा गाडा' ते विजय तेंडुलकर यांनी लिहिलेल्या, अरविंद देशपांडे यांनी दिग्दर्शित केलेल्या, 'पाहिजे जातीचे' या नाटकातील नानाच्या रांगड्या, मस्तवाल, टेरर 'बबन्या'शी जोडल्या गेलेल्या आठवणी. अनेकांचा नाना पाटेकर नावाशी बांधलेला एक मजबूत धागा. नाना पाटेकर व्यक्ती एक पण त्याची रूपं अनेक. माणूस एक पण त्याचे रंग अनेक.

नानाची कारकीर्द अथांग, त्याच्या वागण्या- बोलण्यासह एकूणच व्यक्तिमत्त्वासह. विजयाबाईंची रंगायन, अरविंद-पप्पा देशपांडेंची आविष्कार संस्था प्रायोगिक, हौशी नाटकांपासून सुरू केलेला प्रवास. नानाने तेव्हा पुण्यात जाऊन स्पर्धेचं भाऊ मुरारराव हे नाटक मोहन गोखलेंसोबत केलं होतं. नानाने छबिलदास ते शिवाजी नाट्य मंदिर-व्यावसायिक रंगभूमी असा प्रवास सुरू केला तो माऊली प्रॉडक्शनच्या निर्माता उदय धुरतच्या हमीदाबाईची कोठी नाटकापासून. तगडी मल्टीस्टारकास्ट असलेल्या नाटकापासून. तेव्हा छबीलदासहून रस्ता क्रॉस करून समोरच्या शिवाजी मंदिरला जाणाऱ्याचं हौशी - प्रायोगिकवाल्यांना भारी कौतुक वाटायचं. जणू आपल्या कुटुंबातील एकजण जिंकल्याची सर्वत्र भावना असायची. तत्पूर्वी पाहिजे जातीचे या नाटकाचे काही प्रयोग व्यावसायिकला झाले होते. त्यानंतर मोहन शेठ तोंडवळकर यांच्या कलावैभव संस्थेच्या महासागर या नाटकामुळे. जयवंत दळवी लिखित - विजया मेहता दिग्दर्शित महासागरमध्ये विमा एजंट दिगंबर ही नायकाची भूमिका साकारून नाना खऱ्या अर्थाने हिरो झाला.




## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पुढाकारातून तयार झालेल्या 'वारी'वरील माहितीपटाचा जागतिक स्तरावर सन्मान

मुंबई । प्रतिनिधी

पंढरपूर आषाढी वारीचा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत निर्मिती करण्यात आलेल्या 'पंढरपूर वारी - इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स' या माहितीपटाची प्रतिष्ठित 'एशियन अकॅडमी क्रिएटिव्ह अवॉर्ड्स २०२६'मध्ये 'सर्वोत्कृष्ट ब्रँडेड कार्यक्रम' श्रेणीत भारताचा राष्ट्रीय विजेता म्हणून निवड झाली आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीचे हे जागतिक पटलावर उमटलेले प्रतिबिंबच आहे.

महाराष्ट्राचे वैभव असलेली पंढरपूर वारीची भक्तिमार्गातली समृद्ध परंपरा जगासमोर आणण्याच्या उद्देशाने या माहितीपटाची निर्मिती करण्यात आली. माहिती व जनसंपर्क विभाग आणि वॉर्नर ब्रदर्स डिस्कवरी यांच्यामार्फत निर्मित या माहितीपटाचे डिस्कवरीच्या जगभरातील विविध वाहिन्यांवरुन प्रसारण करण्यात आले आहे.

महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा, वारकरी संप्रदायाचा आणि शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या पंढरपूर वारीचा जागतिक प्रेक्षकांना परिचय करून देण्यासाठी २२ मिनिटांचा इंग्रजी भाषेतील माहितीपट तयार करण्यात आला आहे. संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराजांनी दिलेला भक्ती, समता, मानवता आणि बंधुभावाचा संदेश भाषेच्या मर्यादा ओलांडून आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर पोहोचविण्याच्या दृष्टीने हा माहितीपट महत्त्वपूर्ण ठरला आहे.

वारीच्या गौरवशाली परंपरेचा आंतरराष्ट्रीय स्तरावर बहुमान - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

यासंदर्भात प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पंढरपूर वारी ही भक्तीमार्गातील अतिशय प्राचीन परंपरा असून ती जात, धर्म, गरीब-श्रीमंत असा कोणताही भेद न करता सर्वांना विठुरायाच्या रंगात रंगवून एकत्र आणते. ही महान परंपरा, तिचे उद्दिष्ट आणि विचार जगभरात पोहोचवण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत 'पंढरपूर वारी - इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स' ही सुंदर डॉक्युमेंट्री तयार करून रिलीज करण्यात आली आहे. या डॉक्युमेंट्रीला 'एशियन अकॅडमी क्रिएटिव्ह अवॉर्ड्स २०२६ मध्ये भारत देशासाठीचा 'सर्वोत्कृष्ट ब्रँडेड कार्यक्रम' हा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. यासाठी माहिती व जनसंपर्क विभाग आणि वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी यांचे मी अभिनंदन करतो. वारीची गौरवशाली परंपरा जगासमोर मांडणारी माहितीपट सर्वांनी पाहावा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

वारीची सांस्कृतिक परंपरा आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित- प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव व महासंचालक ब्रिजेश सिंह म्हणाले की, आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील विविध देशांमधून सादर झालेल्या दर्जेदार निर्मितींमधून या माहितीपटाची भारताचा राष्ट्रीय विजेता म्हणून निवड झाली. या बहुमानामुळे महाराष्ट्राची भक्तीपरंपरा, संतसाहित्य, सामाजिक समतेचा संदेश आणि वारीची वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक परंपरा आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाली आहे.

पान १ वरून..

### करपलेली पिके,आटलेल्या ...

गंभीर परिणाम झाल्याचे सादरीकरणात स्पष्ट करण्यात आले. विभागातील धरणांमधील पाणीसाठा ३०.७ टक्क्यांवर आला आहे. जालना, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यांत भूजल पातळी मागील पाच वर्षांच्या सरासरीपेक्षा चार ते पाच मीटरने खाली गेली आहे. विभागातील १९० गावे आणि १५७ वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत असून ६०३ विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. टंचाई निवारण, चारा उपलब्धता आणि रोजगार हमीच्या उपाययोजनांची माहितीही पथकाला देण्यात आली. या माहितीची प्रत्यक्ष पडताळणी करून परिस्थितीचा अहवाल शासनाला सादर करण्यात येईल, असे पथकप्रमुख मुक्तानंद अग्रवाल यांनी स्पष्ट केले.

देमनीत करपलेल्या सोयाबीनमागची वेदना..

शुक्रवारी सकाळी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील देमनी शिवारात केंद्रीय पथकाने शेतकरी विकास देविदास शिंदे यांच्या गट क्रमांक ८४ मधील १ हेक्टर २० आर क्षेत्रावरील करपलेल्या सोयाबीन पिकाची पाहणी केली. मशागत, बियाणे, खते आणि मजुरीसाठी केलेला खर्च पावसाअभावी वाया गेल्याची व्यथा शेतकऱ्यांनी मांडली. पिकाच्या उत्पन्नावर घरखर्च, मुलांचे शिक्षण आणि कर्जफेडीची गणिते अवलंबून असतात. पीक हातचे गेल्याने या सर्व अपेक्षांवर पाणी फिरते, याची जाणीव या पाहणीतून झाली.

पथकाने विलास देविदास शिंदे यांच्यासह परिसरातील अन्य शेतकऱ्यांशी संवाद साधून नुकसानीचे स्वरूप आणि पुढील काळातील अडचणी जाणून घेतल्या.

जालन्यात नाणेगावपासून गल्हाटीपर्यंत पाहणी..

केंद्रीय पथकाने जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील नाणेगाव तसेच अंबड तालुक्यातील किणगाववाडी आणि जामखेड परिसरातील शेतशिवारांची पाहणी केली. या दौऱ्यात आमदार नारायण कुचे, राज्याचे कृषी सचिव परिमल सिंग, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल उपस्थित होते.

बदनापूर तालुक्यातील नाणेगाव येथे शेतकरी शिवाजी डोंगरे यांच्या शेतातील करपलेल्या सोयाबीन पिकाची,अंबड तालुक्यातील किणगाववाडी येथे उदल हरीचंद शिहिरे यांच्या शेतातील करपलेली मोसंबीची झाडे आणि कोरडे पडलेले शेततळे पाहण्यात आले. याच परिसरात शिवलाल गांगे यांच्या शेतातील अदरक पिकाची, तर बालचंद गांगे यांच्या शेतातील कापूस पिकाची पाहणी करण्यात आली. जामखेड येथे संतोष गुरुके यांच्या शेतातील बाजरी पिकाची आणि गणेश जुंजार यांच्या शेतातील कोरड्या विहिरीची पाहणी करून पाण्याच्या उपलब्धतेची माहिती घेण्यात आली.

अंबड तालुक्यातील कोरड्या पडलेल्या गल्हाटी मध्यम प्रकल्पाचीही पथकाने पाहणी केली. प्रकल्पावर अवलंबून असलेल्या गावांच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न, सिंचनासाठी घटलेली पाण्याची उपलब्धता आणि मच्छीमारीवर उपजीविका करणाऱ्या १०६ कुटुंबांच्या अडचणी जाणून घेण्यात आल्या. प्रकल्प परिसरातील उत्तमराव साळुंके यांच्या शेतातील कापूस पिकासह अन्य शेतांतील ऊस पिकांचीही पाहणी करण्यात आली. पाण्याअभावी फळबागा आणि खरीप पिकांचे नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांनी वाढता उत्पादन खर्च आणि उत्पन्नाबाबतची अनिश्चितता पथकासमोर मांडली.

बीडमध्ये कपाशी, ऊस ,सोयाबीनची पाहणी

जालना जिल्ह्यातील पाहणीनंतर केंद्रीय पथकाने बीड जिल्ह्यातील गेवराई आणि बीड तालुक्यांतील दुष्काळग्रस्त भागांचा दौरा केला. या वेळी आमदार विजयसिंह पंडित, राज्याचे कृषी सचिव परिमल सिंग, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे उपस्थित होते.

गेवराई तालुक्यातील जातेगाव फाटा परिसरातील पाहणीनंतर अर्धमसला आणि रानमळा परिसरातील पिकांची स्थिती जाणून घेण्यात आली. अर्धमसला येथील शेतकरी सुरेश बाबुराव नरवाडे यांच्या गट क्रमांक ९४ मधील १.४० हेक्टर क्षेत्रावरील कपाशी पिकाची, तर संतोष बाबुराव नरवाडे यांच्या गट क्रमांक ३३१ मधील ०.६७ हेक्टर क्षेत्रावरील ऊस पिकाची पाहणी करण्यात आली. गेवराई येथील मदन रामभाऊ मोटे यांच्या ०.८० हेक्टर क्षेत्रावरील कपाशी पिकाच्या नुकसानीचीही माहिती घेण्यात आली.

पावसाच्या दीर्घ खंडामुळे कपाशी, ऊस आणि तुती पिकांवर परिणाम झाला आहे. तुतीची वाढ खुंटल्याने अपेक्षित उत्पादनाबाबत अनिश्चितता निर्माण झाली असून करपलेल्या पिकांचा जनावरांसाठी चारा म्हणूनही उपयोग होत नसल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. मदन रामभाऊ मोटे यांच्या तूर आणि कपाशी पिकांची पाहणी करताना जुलैच्या पहिल्या आठवड्यापासून पाऊस नसल्यामुळे झालेल्या नुकसानीची माहिती पथकाने घेतली. विहिरीतील पाणी आटल्याने पिण्याच्या पाण्यासाठी स्वखर्चाने टँकर मागवावा लागत असल्याची व्यथा त्यांनी मांडली. परिसरातील अन्य शेतकऱ्यांनीही ऊस पीक जळून गेल्याचे सांगितले.

बीड तालुक्यातील पारगाव जप्ती येथे शेतकरी सतीश सखाराम देवळे यांच्या गट क्रमांक ५० मधील ०.४० हेक्टर क्षेत्रावरील सोयाबीन पिकाची पाहणी करण्यात आली. त्यानंतर नांदुरा हवेली येथे सिंदफणा नदीच्या कोरड्या पात्राची पाहणी करून परिसरातील पाणीटंचाईचा आढावा घेण्यात आला. माजलगाव धरणातील पाणीसाठा सरासरीच्या २६ टक्क्यांपर्यंत घसरल्याची माहिती यावेळी देण्यात आली. पावसाचे पाणी अडविण्यासाठी बंधारे उभारणे, भूजल पुनर्भरण वाढविणे आणि गाळ साचलेल्या विहिरींचे पुनरुज्जीवन करणे, अशा उपाययोजनांची आवश्यकता स्थानिकांनी मांडली.

विभागीय आयुक्तालयातील सादरीकरणापासून सुरू झालेला आणि दुसऱ्या दिवशी दुपारी चार वाजेपर्यंत चाललेला हा दौरा दुष्काळाच्या विविध पैलूंची प्रत्यक्ष पडताळणी करणारा ठरला.

करपलेली पिके, कोरड्या विहिरी, घटलेले जलस्रोत आणि रोजगाराची अनिश्चितता यातून शेतकरी व शेतमजुरांसमोरील आव्हाने स्पष्ट झाली. विशेषतः महिला शेतमजुरांशी संवाद साधण्यासाठी ताफा थांबविण्याच्या प्रसंगातून दुष्काळाच्या परिणामांकडे मानवी आणि सामाजिक दृष्टिकोनातून पाहण्याची गरज अधोरेखित झाली.

केंद्रीय पथक प्रत्यक्ष पाहणी आणि संबंधित विभागांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे परिस्थितीचा अहवाल शासनाला सादर करणार आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचून त्यांचे प्रश्न ऐकणे, नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करणे आणि पाणीटंचाईपासून उपजीविकेपर्यंतच्या अडचणी समजून घेणे, हा मदतीच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा आहे. दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांना दिलासा मिळावा आणि आवश्यक उपाययोजनांना दिशा मिळावी, या दृष्टीने केंद्रीय पथकाचा हा दौरा महत्त्वाचा ठरला.

### राज्यातील आणखी ....

२०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील २६५ तालुक्यांत ट्रिगर-१ निकषांनुसार दुष्काळ जाहीर करून विविध १२ उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत.

मंत्रिमंडळ उपसमितीच्या २९ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या बैठकीतील निर्देशांनुसार जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीतील पर्जन्याची तूट आणि अन्य घटकांचा विचार करून आणखी १८ तालुक्यांमध्ये प्रत्यक्ष पाहणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मदत व पुनर्वसन विभागाने याबाबत शासन निर्णय जारी केला आहे.

या १८ तालुक्यांमध्ये होणार पाहणी..

नांदेड: मुदखेड, मुखेड, चंद्रपूर: जिवती, ब्रह्मपुरी, बल्लारपूर, गोंदिया: आमगाव, देवरी, सालेकसा, गोंदिया, वर्धा: कारंजा, भंडारा: मोहाडी, तुमसर, नाशिक: त्र्यंबकेश्वर, चांदवड, निफाड, सातारा: पाटण, सांगली: शिराळा, वाळवा.

दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ मधील तरतुदींनुसार ही पडताळणी करण्यात येणार आहे.

पान १ वरून..

उपग्रह छायाचित्रे, नकाशे आणि संगणकीय माहितीच्या आधारे प्राप्त झालेल्या निष्कर्षांची प्रत्यक्ष क्षेत्रभेटीद्वारे खातरजमा केली जाणार आहे. प्रमुख पाच पिकांचे २० टक्के सर्वेक्षण केल्यामुळे पिकांची प्रत्यक्ष स्थिती आणि दुष्काळाच्या तीव्रतेचे मूल्यमापन अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. या प्रक्रियेमुळे तांत्रिक माहिती आणि प्रत्यक्ष शेतातील परिस्थिती यांची सांगड घालून दुष्काळाचे अधिक अचूक चित्र समोर येईल. परिणामी, दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील निर्णय घेण्यासाठी शासनाला वस्तुनिष्ठ माहिती उपलब्ध होणार आहे.

### जिल्ह्यात अवैध....

संयुक्त पथकाने वडवणी तालुक्यातील उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्पावर पाहणी केली. यावेळी काही शेतकरी विनापरवाना विद्युत मोटारी टाकून पाणी उपसा करत असल्याचे निदर्शनास आले. अधिकाऱ्यांनी त्यांना मोटारी काढून घेण्याच्या सूचना दिल्या असता, त्यांनी हुज्जत घालत शासकीय कामात अडथळा निर्माण केला. याप्रकरणी दिनांक ०८ ऑक्टोबर रोजी वडवणी पोलीस ठाण्यात संबंधितांवर भारतीय न्याय संहिता (इछड) कलम २२१, २२३ (र), ३(५) आणि ३२४(४) अन्वये प्रथम माहिती अहवाल (ऋखठ) दाखल करण्यात आला आहे.

दुसरी कारवाई केज तालुक्यातील आरणवाडी साठवण तलावावर दिनांक ०८ ऑक्टोबर रोजी करण्यात आली. लघु पाटबंधारे उपविभाग, केजचे अधिकारी आणि पोलीस प्रशासनाने संयुक्त पाहणी केली असता, तेथेही विनापरवाना विद्युत मोटारींद्वारे पाणी उपसा सुरू असल्याचे आढळले. अधिकाऱ्यांनी मोटारी काढण्याचे निर्देश दिल्यानंतर संबंधितांनी अधिकाऱ्यांशी हुज्जत घातली. या प्रकाराची दखल घेत शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी संबंधित व्यक्तींविरुद्ध धारूर पोलीस ठाण्यात इछड कलम २२१ अन्वये 'एनसी' दाखल करण्यात आली आहे. त्यानंतर पोलिसांच्या मध्यस्थीने घटनास्थळावरून सर्व अवैध मोटारी व पाईपलाईन्स काढून घेण्यात आल्या असून, सध्या तेथे कोणतीही अवैध मोटार अस्तित्वात नाही.

भविष्यात या किंवा इतर कोणत्याही प्रकल्पांमधून अशा प्रकारे विनापरवाना पाणी उपसा केल्यास संबंधितांवर महाराष्ट्र सिंचन कायदा व भारतीय न्याय संहितेअंतर्गत (इछड) कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे. सार्वजनिक जलसंपत्तीच्या संरक्षणासाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

### ज्येष्ठ अभिनेते पद्मश्री....

महापौर मंजुषा नागपुरे, सभापती युवराज काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक रंजन कुमार शर्मा, अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंडे, पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल,

यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

मराठी रंगभूमी तसेच मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत नाना पाटेकर यांनी आपल्या प्रभावी अभिनयाने स्वतंत्र ओळख निर्माण केली. प्रदीर्घ कलाप्रवासात त्यांनी विविधांगी भूमिका साकारत रसिकांच्या मनावर ठसा उमटविला. अभिनयासोबतच सामाजिक क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले.

अंत्यसंस्कारापूर्वी नाना पाटेकर यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेण्यासाठी डोणजे येथे नागरिक, कलाकार, सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती, चाहते तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांनी अंत्यदर्शन घेत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.पोलिस दलाच्यावतीने शासकीय इतमामात मानवंदना देण्यात आली.

### देमनीच्या शिवारात ....

पूर्वानुमान केंद्राचे उपसंचालक सुनील कुमार दुबे, नीती आयोगाचे सल्लागार डॉ. जसपाल सिंग, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या पशुधन अधिकारी डॉ. साक्षी भदौरिया यांचा या पथकात समावेश आहे.

या पाहणीत राज्याचे कृषी सचिव परिमल सिंग, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड तसेच अन्य अधिकारीही सहभागी होते.खरेतर प्रशासनाने सादर केलेल्या तक्ते आणि आकडेवारीत बंद दाराआड दुष्काळ कळतो. बैठकांचे सोपस्कारही पार पाडता आले असते. मात्र दुष्काळाची भीषणता दिसते ते शेतकऱ्याच्या करपलेल्या स्वप्नात, आसवं सुकलेल्या डोळ्यांत. ज्या पिकाच्या भरवशावर शेतकऱ्याच्या डोळ्यात वर्षभराची स्वप्ने असतात. संसाराची गणिते असतात. तिच पिके पावसाअभावी जळून जातात तेव्हा त्या हिरव्या स्वप्नांची अक्षरशः राख रांगोळी झालेली दिसते. देमनी येथील शेतकरी विलास शिंदे यांनी केली होती मशागत, लागवडीची मेहनत, बियाणे, खते, मजूरी यासाठी खर्च मात्र पावसाने पाठ फिरवली आणि सगळं होत्याचं नव्हतं झालं. ही दाहकता आज केंद्रीय पथकाने प्रत्यक्ष शेतात जाऊन अनुभवली.

केंद्रीय पथकाने सकाळी देमनी शिवारात भेट देऊन प्रत्यक्ष पीक नुकसानीची पाहणी केली. कागदावरील तक्त्यांमध्ये दिसणाऱ्या आकडेवारीपलीकडे जाऊन शेतातील वास्तव जाणून घेतले. याठिकाणी जमलेल्या परिसरातील शेतकऱ्यांशी संवाद साधून पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीची आणि त्यांच्या अडचणींची माहिती घेतली. आपुलकीने झालेला हा पाहणी दौरा केवळ प्रशासकीय सोपस्कार न ठरता, शेतकऱ्यांना धीर दिलासा देणारा ठरला.

झालेल्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे, मदतीचे नियोजन, त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांपासून महसूलमंत्री, स्थानिक लोकप्रतिनिधी सगळ्यांनी वेळोवेळी भेट देऊन शेतकऱ्याला दिलेला धीर. शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकणे, प्रत्यक्ष परिस्थिती समजून घेणे, हा मदतीच्या दिशेने टाकलेला महत्त्वाचा टप्पा आहे. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी, हे केवळ एक वाक्य न राहता ते प्रत्यक्षात येणारी अनुभूती आहे, याचाच प्रत्यय यानिमित्ताने आला.

### अंबाजोगाई जि.प.बां.उ.वि.....

कर्मचारी वेगळेच असल्याची खात्रीशीर माहिती सूत्रांकडून ऐकायला मिळत आहे. तेव्हा एवढा मोठा गैरप्रकार घडताना राजेंद्र काळे हे काय झोपा काढत होते का..? खरच त्यांना सुरू असलेल्या या अनागोंदी व्यवहारांची यतकिंचितही भनक लागलेली नव्हती का..? असे एक ना अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत असल्याने व या प्रकरणाच्या अनुषंगाने वेगळीच संशयास्पद माहिती समोर येत असल्याने आणि या प्रकरणाची एकंदरीत वास्तव परिस्थिती तपासली असता अनपेक्षित माहिती मिळत आहे. तेव्हा यात खरंच राजेंद्र काळे यांचा काडीमात्र संबंध नाही का..? असाही प्रश्न मोठा आ करून निर्माण होतो आहे. त्यामुळे जर या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन या प्रकरणातील वास्तविकता पडताळून खरी सत्यता बाहेर आणायची असेल तर, अगोदर राजेंद्र काळे यांची चौकशी होणे नितांत गरजेचे आहे. असेच अनेक छोटे-मोठे गुत्तेदार नाव न छापण्याच्या अटीवर आमच्या प्रतिनिधीशी बोलले असून आता खरंच हे मैल प्रकरण असो की, अंबाजोगाई उपअभियंता कार्यालयातील अलीकडच्या दोन-तीन वर्षात झालेला भ्रष्टाचार असो. या सर्वांच्या पाठीशी नेमके कोण आहे आणि याचा करताकरविता धनी राजेंद्र काळेच आहे का..? हे जर खरोखरच उघडकीस आणायचे असेल तर, बीड जिल्ह्याचे सीईओ म्हणून रुजू झाल्याच्या दिवसापासून आजतागायत एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ज्यांच्याकडे जिल्हा मोठ्या अपेक्षेने पाहतो आहे. असे जि.प.बीडचे सीईओ जतिन रहमान साहेब डोळे उघडे ठेवून अगदी धीटपणाने काळे यांची सखोल अशी नीट चौकशी करतील का आणि या एका मैल प्रकरणाच्या अनुषंगाने खरा नेमका काय प्रकार आहे हे उघडकीस आणून संबंधित दोषींवरती कडक कारवाई करतील का..? या याकडे आता संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष लागून आहे.

(नोट:- आता सत्यता बाहेर येईपर्यंत उपअभियंता राजेंद्र काळे यांच्या काळया कारनाम्यांची मालिका आवर्जून वाचा....)

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८३३/२०२६**
**बसंती भ्र. कल्याण सोळुंके व इतर वि. निरंक**
**(मार्फत - ॲड. व्ही.एस. शिंदे)**

ज्याअर्थी मयत नामे कल्याण सखाराम सोळंके, रा.शिरसवीता. गेवराई जि.बीड हे/हया दिनांक १६/०१/२०२५ रोजी सिरसदेवी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ बसंती भ्र. कल्याण सोळुंके, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. सिरसदेवी ता. गेवराई जि.बीड अर्जदार क्र. २ अमोल पि. कल्याण सोळुंके, वय २६ वर्षे, धंदा शेती, रा. सिरसदेवी ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. ३ महादेव पि. कल्याण सोळुंके, वय २३ वर्षे, धंदा शेती, रा. सिरसदेवी ता. गेवराई जि.बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत कल्याण सखाराम सोळुंके यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०६/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख - २४/११/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**मा. श्री. रविंद्र अ.मिसाळ, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. १, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ५१३/२०२६**
**राजेश वि.मा.ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय**
(मार्फत ॲड एस.एस.काळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **राजेश सखाराम शिंदे वय-३८ वर्षे, रा.रामेश्वर ता.गेवराई** यांनी **गैरअर्जदार ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय पाचेगांव ता.गेवराई जि.बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) **अर्जदाराचे वडील सखाराम मारूती शिंदे, रा.रामेश्वर ता.गेवराई जि.बीड यांचा दि.१६.०८.२०२२ रोजीची** रोजीची मृत्यू नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०८/१०/ २०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख :- ०४/११/२०२६.

**क. लिपीक**

शिक्का

**आदेशावरुन**
**सहा. अधिक्षक,**
**फौजदारी न्यायालय, गेवराई.**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ नागरी अर्ज क्रमांक ७८२/२०२६**
**राम पि.भागवत लोखंडे आणि इतर वि. निरंक**
**मार्फत -ॲड.एस.ए.शेजूळ, गेवराई**

अर्जदार

१. राम पि. भागवत लोखंडे वय ३६ वर्षे, धंदा शेती, रा. रूई ता. गेवराई जि. बीड

२. उषा भ्र. लक्ष्मण शिंदे वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. सहयोग नगर, किर्ती मेडिकल, जाधववाडी, चिखली बु. ता. चिखली जि. पुणे

३. आशा भ्र. बाळु मुळे वय ४४ वर्षे, धंदा घरकाम, रा. मेन रोड, गेवराई ता. गेवराई जि. बीड

४. भागवत पि. भगवान लोखंडे वय ७० वर्षे, धंदा- शेती, रा. रूई ता. गेवराई जि. बीड

ज्याअर्थी मयत शिवशेलाबाई भ्र. भागवत लोखंडे हे/हया अनुकम दिनांक २२/०७/२०२६ गंजी मौजे रूई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे कला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणण असल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकनी न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिमल्यास अर्जदार यांना सदर मयत शिवशेलाबाई भ्र. भागवत लोखंडे, रा. रूई ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २८/०९/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख:- १६/११/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

## शेतकरी कुटुंबांना उभारी देणाऱ्या नटश्रेष्ठ नाना पाटेकरांना

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील आंदोलन कट्ट्यावर सामाजिक कार्यकर्त्यांकडुन भावपूर्ण श्रद्धांजली..!

बीड । प्रतिनिधी

दुष्काळग्रस्त आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना जगण्याचे बळ देणारे, जलसंधारणाच्या माध्यमातून नद्यांना पुनरुज्जीवन देणारे ज्येष्ठ अभिनेते तथा नाम फाऊंडेशनचे संस्थापक नटश्रेष्ठ नाना पाटेकर यांच्या निधनाने बीड जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे. नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून त्यांनी जिल्ह्यात केलेल्या सामाजिक कार्याच्या आठवणींना उजाळा देत सामाजिक कार्यकर्त्यांनी शुक्रवारी (दि.९) बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील आंदोलन कट्ट्यावर त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

**११२ किलोमीटर नदी-नाल्यांचे खोलीकरण,१५० गावांना जलसंधारणाचा आधार.!**

बीड जिल्ह्यात नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून जलसंधारणाची विविध कामे करण्यात आली. जिल्ह्यातील सुमारे १५० गावांमध्ये नद्या, नाले आणि जलसाठ्यांमधील गाळ काढणे, रुंदीकरण व खोलीकरण अशी कामे राबविण्यात आली. सुमारे ११२ किलोमीटर नदी-नाल्यांचे खोलीकरण व पुनरुज्जीवन करण्यात आल्याने १० हजार हेक्टरपेक्षा अधिक शेतीला या कामांचा थेट लाभ झाल्याचे सांगण्यात आले.

दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकऱ्यांना पाण्याची उपलब्धता वाढवून देणे, शेतीला आधार देणे आणि ग्रामीण भागातील पाणीटंचाई कमी करण्याच्या दृष्टीने या कामांचे महत्त्व मोठे होते. केवळ मदत वाटपापुरते मर्यादित न राहता, पाण्याच्या प्रश्नावर कायमस्वरूपी उपाय शोधण्याचा प्रयत्न नानांच्या सामाजिक कार्यातून दिसून आला.

**५०० हून अधिक आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदतीचा हात.!**

शेतकरी आत्महत्यांमुळे उघड्यावर आलेल्या कुटुंबांचे दुःख जाणून घेत नाम फाऊंडेशनने त्यांना आर्थिक मदत आणि जगण्याचा आधार देण्याचा प्रयत्न केला. २०१५ मध्ये बीड जिल्ह्यात आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या मदतीसाठी पहिला कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात २३० महिलांना प्रत्येकी १५ हजार रुपयांची मदत देण्यात आली. त्यानंतरही मदतीचा हा उपक्रम सुरू ठेवत ५०० हून अधिक कुटुंबांपर्यंत मदत पोहोचविण्यात आली.

पतीच्या निधनानंतर संसाराची जबाबदारी एकट्याने पेलणाऱ्या महिलांच्या आयुष्यातील दुःख कमी करणे सोपे नव्हते. त्यांच्या कपाळावरील



कुंकू आणि हरवलेले पतीचे छत्र परत आणणे शक्य नसले, तरी त्यांच्या उघड्या पडलेल्या संसाराला सावरण्यासाठी नानांनी मायेचा हात पुढे केला. संकटग्रस्त महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी शिलाई मशीन आणि पिठाच्या गिरण्यांचे वाटप करण्यात आले. शालेय मुलींना सायकली, दुष्काळग्रस्त कुटुंबांना अन्नधान्य आणि दिवाळीच्या काळात किराणा किट देऊन त्यांना दिलासा देण्यात आला.

**आर्वी येथील शांतीवन प्रकल्पात विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह..**

बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यातील आर्वी येथे शांतीवन सामाजिक प्रकल्पात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांसाठी २०० विद्यार्थी क्षमतेचे वसतिगृह उभारण्यात आले. शेतकरी कुटुंबांवर कोसळलेल्या संकटाचा त्यांच्या मुलांच्या शिक्षणावर परिणाम होऊ नये, त्यांना सुरक्षित निवास आणि शिक्षणाच्या संधी मिळाव्यात, या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरला.

आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुलांचे शिक्षण सुरू राहावे आणि त्यांना परिस्थितीशी लढण्याची ताकद मिळावी, हा या उपक्रमामागील संवेदनशील दृष्टिकोन होता.

**सामूहिक विवाह सोहळ्यांतून आर्थिक संकटग्रस्त कुटुंबांना दिलासा..**

दुष्काळ आणि आर्थिक संकटामुळे मुला-मुलींच्या विवाहाचा खर्च पेलणे अनेक शेतकरी कुटुंबांना कठीण होते. ही अडचण ओळखून नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करण्यात आले.

या सोहळ्यांत विवाहबद्ध होणाऱ्या वधू-वरांना संसारोपयोगी भांडी, कपडे आणि इतर आवश्यक वस्तू भेट देण्यात आल्या. आर्थिक अडचणींमुळे विवाहाचा खर्च पेलू न शकणाऱ्या कुटुंबांना यामुळे आधार मिळाला.

**आंदोलन कट्ट्यावर सामाजिक कार्यकर्त्यांकडून श्रद्धांजली..**

नाना पाटेकर यांच्या निधनानंतर त्यांच्या सामाजिक कार्याचे स्मरण करत बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील आंदोलन कट्ट्यावर सामाजिक कार्यकर्त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली. शेतकरी कुटुंबांचे दुःख समजून घेणारे, दुष्काळग्रस्त भागातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणारे आणि निराधार कुटुंबांना जगण्याची उमेद देणारे व्यक्तिमत्त्व म्हणून नानांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.यावेळी डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर, बाळासाहेब मोरे पाटील, माजी सैनिक अशोक येडे, सय्यद सादेक, रामधन जमाले, राजेंद्र आमटे, हनुमान घोडके, भीमराव कुटे, डॉ. संजय तांदळे, शेलार शिवशर्मा, डॉ लक्ष्मण पवार आदी उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या दुःखावर मायेची फुंकर घालणारे, जलसंधारणातून शेतीला आधार देणारे आणि संकटग्रस्त कुटुंबांना पुन्हा उभे राहण्याची उमेद देणारे नाना पाटेकर यांच्या सामाजिक कार्याच्या आठवणी बीड जिल्ह्यातील जनतेच्या मनात कायम राहतील, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

---

# दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय पथकाकडून पीक परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी

## नाणेगाव, किणगाववाडी, जामखेड परिसरातील शेतकऱ्यांशी संवाद साधून जाणून घेतली वस्तुस्थिती

जालना (जिमाका)

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथकाने जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील नाणेगाव तसेच अंबड तालुक्यातील किणगाववाडी आणि जामखेड परिसरातील शेतपिकांची प्रत्यक्ष पाहणी करून पीक परिस्थितीचा सविस्तर आढावा घेतला. पावसाअभावी पिकांच्या वाढीवर झालेला परिणाम, पाण्याची उपलब्धता, संभाव्य पीक नुकसान आणि शेतकऱ्यांसमोरील अडचणी यांची प्रत्यक्ष शेतावर जाऊन माहिती घेत पथकाने दुष्काळी परिस्थितीची वस्तुस्थिती जाणून घेतली.

कृषी व शेतकरी कल्याण विभागाचे संयुक्त सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील या केंद्रीय पथकात महालनोबिस राष्ट्रीय पीक पूर्वानुमान केंद्राचे उपसंचालक सुनील कुमार दुबे, नीती आयोगाचे सल्लागार डॉ. जसपाल सिंग आणि पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या पशुधन अधिकारी डॉ. साक्षी भदौरिया यांचा समावेश होता.

यावेळी आमदार नारायण कुचे, राज्याच्या कृषी विभागाचे सचिव परिमल सिंग, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, छत्रपती संभाजीनगर विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रशांत चौधरी, बदनापूर उपविभागीय अधिकारी लता बागुल आणि घनसावंगी-अंबड उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी उपस्थित होते.



**बदनापूर आणि अंबड शेतशिवारात जाऊन पिकांची पाहणी, नुकसानीची घेतली माहिती**

केंद्रीय पथकाने बदनापूर तालुक्यातील नाणेगाव येथे शेतकरी शिवाजी डोंगरे यांच्या शेतातील करपलेले सोयाबीन पिकाची पाहणी केली. अंबड तालुक्यातील किणगाववाडी येथे शेतकरी उदल हरीचंद शिहिरे यांच्या शेतातील करपलेली मोसंबीची झाडे आणि कोरडे पडलेले शेततळे यांची स्थिती पाहिली. याच परिसरातील शिवलाल गांगे यांच्या शेतातील अदरक पिकाची, तर बालचंद गांगे यांच्या शेतातील कापूस पिकाची पाहणी करण्यात आली.

जामखेड येथे शेतकरी संतोष गुरुके यांच्या शेतातील बाजरी पिकाची, तसेच गणेश जुंजार यांच्या शेतातील कोरड्या विहिरीची पाहणी करून पाण्याच्या उपलब्धतेअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीची माहिती घेण्यात आली. याशिवाय अंबड तालुक्यातील कोरड्या पडलेल्या गल्हाटी मध्यम प्रकल्पाची पाहणी केली. या प्रकल्पावर अवलंबून असलेल्या गावांच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न, सिंचनासाठी घटलेली पाण्याची उपलब्धता आणि मच्छीमारीवर उपजीविका करणाऱ्या १०६ कुटुंबाच्या समस्यांची माहिती पथकाने घेतली.तसेच प्रकल्प परिसरातील उत्तमराव साळुंके यांच्या शेतातील कापूस तसेच अन्य शेतांमधील ऊस पिकांचीही पाहणी करून पिकांच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला.

नाणेगाव, किणगाववाडी आणि जामखेड परिसरातील विविध पिकांची पाहणी करताना केंद्रीय पथकाने पिकांची वाढ, पावसाअभावी झालेली हानी आणि संभाव्य उत्पादनावर होणाऱ्या परिणामांची प्रत्यक्ष माहिती घेतली. खरीप हंगामातील पिकांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी पथकाने संबंधित शेतकऱ्यांशी संवाद साधला. पर्जन्यमान, पावसातील खंड, उपलब्ध पाण्याची स्थिती आणि त्याचा पिकांच्या वाढीवर झालेला परिणाम याबाबत शेतकऱ्यांकडून सविस्तर माहिती जाणून घेण्यात आली.

यावेळी शेतकऱ्यांनी पिकांचे झालेले नुकसान, वाढता उत्पादन खर्च आणि सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता यांसंदर्भातील अडचणी पथकासमोर मांडल्या. प्रतिकूल हवामान आणि पावसाच्या अनिश्चिततेमुळे शेतीसमोर निर्माण झालेल्या आव्हानांची जाणीव करून देत शेतकऱ्यांनी आपल्या परिस्थितीची माहिती दिली.

कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी केंद्रीय पथकाला जिल्ह्यातील पर्जन्यमान, पीक परिस्थिती आणि दुष्काळसदृश स्थितीबाबत सविस्तर माहिती दिली. प्रत्यक्ष शेतशिवारातील पाहणी, पिकांची स्थिती आणि शेतकऱ्यांशी झालेल्या संवादाच्या आधारे केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथक शासनाला परिस्थितीचा अहवाल सादर करणार आहे.

---



# दुष्काळी संकटात बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभा - आमदार सुरेश धस

## विठ्ठल रुक्मिणी संस्थान येथे शेतकरी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक संपन्न

पाटोदा (विशेष प्रतिनिधी)

तालुक्यात निर्माण झालेल्या तीव्र दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, शेतकरी, फळबाग उत्पादक आणि पशुपालकांच्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी आमदार सुरेश धस यांच्या प्रमुख उपस्थितीत पाटोदा येथील श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान परिसर येथे एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत पाटोदा शहर आणि पारगाव (घुमरा) जिल्हा परिषद गट क्षेत्रातील पाणीटंचाई, चाराटंचाई व पिकांच्या नुकसानीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

या बैठकीत उपस्थित शेतकरी व ग्रामस्थांनी तीव्र पाणीटंचाई, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न, वाळणाऱ्या फळबागा आणि पिकांचे झालेले अतोनात नुकसान यांसारख्या गंभीर समस्या आमदारांसमोर मांडल्या. आमदार सुरेश धस यांनी सर्वांचे म्हणणे अत्यंत गांभीर्याने ऐकून घेतले आणि प्रशासकीय पातळीवर सर्वोतोपरी उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

प्रशासकीय पातळीवर ठोस पाठपुरावा करणारउपस्थितांशी संवाद साधताना आमदार सुरेश धस म्हणाले, तालुक्यात दुष्काळामुळे शेतकरी आणि पशुपालक बांधव मोठ्या संकटात सापडले आहेत. पिण्याच्या पाण्याची आणि जनावरांच्या चाऱ्याची सोय करणे ही आपली पहिली प्राथमिकता आहे. शेतकऱ्यांनी मांडलेल्या प्रत्येक समस्येची नोंद घेण्यात आली असून, शासनाकडून आवश्यक ती सर्व मदत मिळवून देण्यासाठी आणि टँकर तसेच चारा छावण्यांसारख्या उपाययोजना त्वरित लागू करण्यासाठी प्रशासनाकडे सतत पाठपुरावा केला जाईल.

या कठीण काळात दुष्काळग्रस्त शेतकरी आणि पशुपालक बांधवांच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा आहे, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या बैठकीला पाटोदा शहर व पारगाव घुमरा गटातील विविध गावांमधील शेतकरी, फळबाग उत्पादक, पशुपालक, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच नागरिक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८११/२०२६**
**रुक्मिणबाई भ्र. यमाजी जगधने व इतर वि. निरंक**
**(मार्फत - ॲड. एम. वाय. इनामदार)**

ज्याअर्थी मयत नामे यमाजी किसनराव जगधने, रा. संघमित्र नगर, गेवराई ता. गेवराई जि.बीड हे/हया दिनांक ०१/०९/२०१८ रोजी संघमित्र नगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ रुक्मिणबाई भ्र. यमाजी जगधने, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, रा. संघमित्रनगर, गेवराई ता. गेवराई जि.बीड अर्जदार क्र. २ आकाश पि. यमाजी जगधने, वय ४७ वर्षे, धंदा मजुरी, रा. सदर, अर्जदार क्र. ३ आशा भ्र. प्रकाश जगधने, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. सदर, अर्जदार क्र. ४ सिध्दार्थ पि. प्रकाश जगधने, वय २३ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर, अर्जदार क्र. ५ करण पि. प्रकाश जगधने, वय २१ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत यमाजी किसनराव जगधने यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०६/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख - १०/११/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**जाहिर प्रगटन**
**बीड येथील श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई ता. गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दि. अर्ज क. ७७१/२०२६**
**आसराबाई आणि इतर विरुद्ध निरंक**
**ॲड.एस.पी.येवले**
**अर्जदार**
**१. आसराबाई भ्र गणपतराव सोळुंके, वय ७८ वर्षे, धंदा शेती, रा.सुर्डी, ता. गेवराई जि.बीड**
**२. भगवान पि गणपत सोळुंके, वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा.सुर्डी, ता. गेवराई जि. बीड**
**३.शिवाजी पि गणपतराव सोळुंके, वय ४४ वर्षे, धंदा शेती, रा. सुर्डी, ता. गेवराई जि. बीड**
**४.सतिष पि गणपत सोळुंके ४२ वर्षे, धंदा- शेती रा.सुर्डी, ता. गेवराई जि.बीड**
**विरूध्द**
**निरंक**
**मागणी :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे कायदेशिर वारस म्हणुन प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरीलप्रमाणे अर्ज दाखल केला असून, अर्जदार क ०१ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क ०२ ते ०४हे मयताचे मुले आहेत. मयत नामे गणपतराव पि बाबुराव सोळुंके, यांचा मृत्यु दिनांक २९-०६-२०२२ रोजी लाईफ लाईन हॉस्पीटल औरंगाबाद, छत्रपती संभाजी नगर येथे झाला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू मयत नामे गणपतराव पि बाबुराव सोळुंके, या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहु, नामे गणपतराव पि बाबुराव सोळुंके, यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणून घोषीत करून अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २८/०९/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

पुढील तारीख ०३/११/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**जाहिर घोषणा**
**मा. श्री. एच. एम. मोमीन, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. २, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ३९४/२०२६**
**जमीला अब्दुल शेख वि ग्रामसेवक सुशी**
**(मार्फत ॲड एस. एस. काळे)**

ज्याअर्थी अर्जदार नामे जमीला पि अब्दुल शेख, (माहेरकडील नाव) व जमीला भ्र. कलंदर शेख (सासरकडील नाव) वय ६८ वर्ष रा. सुशी, ता. गेवराई जि बीड ह. मु. चिंचपूर रोड. शर्मा साँ मिल जवळ पाथर्डी ता. पाथर्डी जि. अहमदनगर यांनी गैरअर्जदार ग्रामसेवक सुशी ता. गेवराई ता. गेवराई, जि. बीड यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार स्वतः नामे जमीला पि अब्दुल शेख रा. सुशी, ता. गेवराई जि बीड ह. मु. चिंचपूर रोड, शर्मा साँ मिल जवळ पाथर्डी ता. पाथर्डी जि. अहमदनगर ता. दिनांक ०९/०८/१९५७ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक / ०९/ २०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्कयानिशी दिले.

पुढील तारीख :- २६/१०/२०२६

**क. लिपीक**

शिक्का

**आदेशावरुन**
**सहा. अधिक्षक,**
**फौजदारी न्यायालय, गेवराई.**

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८३१/२०२६**
**परयागबाई भ्र. अंकुश शिंदे व इतर वि. निरंक**
**(मार्फत - ॲड. व्ही.एस. शिंदे)**

ज्याअर्थी मयत नामे अंकुश जिजाभाऊ शिंदे, रा.धानोरा ता. गेवराई जि.बीड हे/हया दिनांक ०८/११/२०२४ रोजी धानोरा ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ परयागबाई भ्र. अंकुश शिंदे, वय ७५ वर्षे, धंदा शेती, रा. धानोरा ता. गेवराई जि. बीड अर्जदार क्र. २ गणेश पि. अंकुश शिंदे, वय ३२ वर्षे, धंदा शेती, रा. धानोरा ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ३ कविता भ्र. रामेश्वर कवचट, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. बोरदेवी ता. जि.बीड, अर्जदार क्र. ४ रंजना भ्र. रविंद आर्सुळ, वय ३४ वर्षे, धंदा शेती, रा. बोरदेवी ता. जि.बीड, अर्जदार क्र. ५ नंदा भ्र. रमेश जाधव, वय ४३ वर्षे, धंदा शेती, रा. तलवाडा ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. ६ संगिता भ्र. जनार्धन भीसे, वय ४० वर्षे, धंदा शेती, रा. तांदळवाडी (भिल्ल) ता. जि.बीड, अर्जदार क्र. ७ सिंधुबाई भ्र. दामोधर गाडे, वय ३८ वर्षे, धंदा शेती, रा. तळवट बोरगाव ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ८ अर्चना भ्र. भाऊसाहेब खराडे, वय ३६ वर्षे, धंदा शेती, रा. अंबील वडगांव ता. जि. बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत अंकुश जिजाभाऊ शिंदे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०६/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख - २४/११/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

# बाजीराव दादा चव्हाण धावले मदतीला; हृदयविकाराच्या रुग्णाला मिळाला उपचाराचा आधार..!

## ४० हजारांची बिलात सवलत तर एक स्ट्रेंथ दादांच्या सहकार्यामुळे मिळाली - सूरकुले

बीड । प्रतिनिधी

हृदयविकाराचा झटका आल्यानंतर उपचारासाठी दाखल झालेल्या मुलुंड ईस्ट, मुंबई येथील देवराम भागूजी सूरकुले यांना उपचारादरम्यान मोठा आर्थिक दिलासा मिळाला. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खासदार श्रीकांत शिंदे साहेब, युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक साहेब आणि शिवसेना वैद्यकीय मदत कक्षप्रमुख मंगेशजी चिवटे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या पाठपुराव्यामुळे सूरकुले यांच्या उपचाराचा मोठा आर्थिक भार कमी झाला. देवराम भागूजी सूरकुले यांना अचानक हृदयविकाराचा झटका आल्याने तातडीने ओम हॉस्पिटल, भोसरी येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर स्ट्रेंथ बसविण्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट झाले. अचानक आलेल्या या वैद्यकीय संकटामुळे कुटुंबीयांसमोर उपचाराच्या खर्चाचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता.

या परिस्थितीत रुग्णाच्या कुटुंबीयांनी मदतीसाठी संपर्क साधल्यानंतर बाजीराव दादा चव्हाण यांनी तातडीने पुढाकार घेत उपचारासाठी पाठपुरावा केला. रुग्णाला शासकीय आरोग्य योजनेचा लाभ मिळावा, यासाठी संबंधित यंत्रणेशी संपर्क साधून आवश्यक ती कार्यवाही करण्यात आली. या पाठपुराव्यामुळे आयुष्मान भारत योजनेअंतर्गत ३ स्ट्रेंथचा उपचार करण्यात आला, तर बाजीराव दादा चव्हाण यांच्या सहकार्यामुळे आणखी एका स्ट्रेंथचा उपचारासाठी मदत मिळाली, अशी माहिती रुग्णाच्या कुटुंबीयांनी दिली.



यासोबतच उपचाराचा आर्थिक भार आणखी कमी करण्यासाठीही प्रयत्न करण्यात आले. खासदार श्रीकांत शिंदे साहेब यांच्या पत्रामुळे व सहकार्यामुळे तब्बल ४० हजारांची सवलत मिळाली, अशी माहिती कुटुंबीयांनी दिली. त्यामुळे गंभीर आजाराच्या उपचारादरम्यान आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या सूरकुले कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला. हृदयविकारासारख्या गंभीर आजारामध्ये वेळेत उपचार मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. त्याचबरोबर उपचाराचा मोठा खर्च हा सर्वसामान्य कुटुंबांसाठी चिंतेचा विषय असतो. अशा परिस्थितीत आयुष्मान भारत योजनेचा लाभ आणि वेळेवर झालेला पाठपुरावा यामुळे देवराम सूरकुले यांना आवश्यक उपचार मिळण्यास मदत झाली. रुग्णाच्या कुटुंबीयांनी या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना सांगितले की, हृदयविकाराचा झटका आल्यानंतर आम्ही मोठ्या चिंतेत होतो. उपचाराचा खर्च कसा करायचा, हा प्रश्न होता. मात्र, बाजीराव दादा चव्हाण यांनी मदतीसाठी पुढाकार घेतला. आयुष्मान भारत योजनेचा लाभ मिळाला आणि खासदार श्रीकांत शिंदे साहेब , बाजीराव दादा चव्हाण यांच्या सहकार्यामुळे ४० हजारांची सवलत मिळाली. त्यामुळे आम्हाला मोठा आधार मिळाला.

या मदतीबद्दल देवराम भागूजी सूरकुले व त्यांच्या कुटुंबीयांनी उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, खासदार श्रीकांत शिंदे, पूर्वेशजी सरनाईक, मंगेशजी चिवटे आणि बाजीराव दादा चव्हाण यांचे आभार मानले.

# अखिल महाराष्ट्र कोष्टी परिषदेच्या महासचिवपदी सुरेश आसलेकर



बीडमध्ये भव्य सत्कार

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यातील सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले तसेच पूर्णवादी बँकेत कार्यरत असणारे सुरेश आसलेकर यांची अखिल महाराष्ट्र कोष्टी परिषदेच्या महासचिवपदी निवड झाल्याबद्दल बीड शहरात भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. ऐतिहासिक कारंजा टॉवर, धांडे गल्ली व पिंगळे गल्ली परिसरात सामाजिक व राजकीय संघटनांच्या वतीने हा सत्कार करण्यात आला.

या सत्कार समारंभाला शिवसेनेचे जिल्हा संघटक नितीन भैया धांडे, प्रसिद्ध उद्योजक तथा युवा नेते झुंजार धांडे, ज्येष्ठ सामाजिक नेते सुरेश तात्या शेटे, नगर परिषदचे माजी सभापती मुकुंद भालेकर, भाजपचे नेते मधुकर धांडे, सोनार संघटनेचे जिल्हाध्यक्ष बाबा पंडित, व्यापारी महासंघाचे माऊली तपसे, डॉक्टर संघटनेचे सदस्य विक्रम कपूर, संतोष वेदपाठक, जालिंदर पन्हाळकर आणि कालिदास नवले यांची प्रमुख उपस्थिती होती.

सुरेशजी आसलेकर यांच्या निवडीचे बीडमध्ये स्वागत

अखिल महाराष्ट्र कोष्टी परिषदेच्या महासचिवपदी झालेली निवड ही त्यांच्या पुढील सामाजिक कार्यासाठी महत्त्वाची जबाबदारी मानली जात आहे. या नव्या जबाबदारीच्या माध्यमातून समाजाच्या संघटनात्मक कार्याला बळ मिळावे आणि सामाजिक उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप प्राप्त व्हावे, अशा भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केल्या.

# माजी मंत्री शिवाजीराव दादा पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यात चिमुकली शाल्वी जवकरच्या नृत्याने जिंकली उपस्थितांची मने.!

विस्मरणात गेलेल्या लोकगीतावर बहारदार नृत्य, गेवराईकरांकडून शाल्वीचे भरभरून कौतुक

गेवराई । प्रतिनिधी

माजी मंत्री मा. शिवाजीराव दादा पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त आयोजित शोभायात्रेत शारदा विद्या मंदिरची विद्यार्थिनी कु. शाल्वी संदीप जवकर हिने आपल्या नृत्यकलेने उपस्थितांची मने जिंकली. विस्मरणात गेलेले 'दाताचं दातवण घ्या गं कुणी' हे लोकगीत सादर करत तिने आपल्या बहारदार नृत्याने शोभायात्रेत विशेष रंगत आणली.

पारंपरिक लोककलेचा सुंदर आविष्कार घडविणाऱ्या शाल्वीच्या नृत्याने शोभायात्रेत उपस्थित नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. तिच्या सादरीकरणातून जुन्या लोकगीतांची आठवण ताजी झाली, तर तिच्या निरागस अदाकारीने उपस्थितांची मने जिंकली. गेवराई शहरातील नागरिकांनी तिच्या नृत्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत टाळ्यांच्या गजरात तिचे कौतुक केले.

आजच्या आधुनिक युगात जुन्या लोकगीतांची परंपरा जपण्याचे काम अशा छोट्या कलाकारांच्या माध्यमातून होत असल्याने शाल्वीच्या सादरीकरणाचे विशेष कौतुक करण्यात आले. आपल्या लहान वयात नृत्यकलेतून लोकसंस्कृतीची ओळख करून देणाऱ्या शाल्वीने अभिष्टचिंतन सोहळ्यात उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

माजी मंत्री शिवाजीराव दादा पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यातील



शोभायात्रेत चिमुकली शाल्वी जवकरच्या नृत्याने आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण केले. तिच्या या कलाविष्कारामुळे गेवराईकरांच्या स्मरणात हा क्षण विशेष ठरला.

# केंद्रियमंत्री रामदास आठवलेंच्या विराट जाहीर सभेस महिलांनी उपस्थित रहावे: मायाताई मिसळे

## आपल्या न्याय व हक्कासाठी सामील व्हा



बीड/ प्रतिनिधी

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची बीड शहरात शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ठीक ४ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली खालील मागण्याची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी विराट जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.

राज्यासह मराठवाड्यात व बीड जिल्ह्यात पावसाने अडीच महिने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा पाण्याचा व मोल मजुरांच्या पोटापाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पावसाअभावी राज्यभर दुष्काळ जाहीर झाला आहे. दुष्काळ जन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १ लाख रुपये मदत देण्यात यावी. शेतमजूर, कामगार व मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या कुटुंबियांना ५० हजार रुपये मदत जाहीर करण्यात यावी. अनु जातीमधील ५९ जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाची प्रक्रिया रद्द करण्यात यावी. कसत असलेल्या २०११ पर्यंतच्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. महागाई निर्देशांकानुसार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्यात यावी.आदी मागण्याची पूर्तता करण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड शहरात दि. १६ ऑक्टोबर २०२६ शुक्रवार रोजी होणाऱ्या

विराट जाहीर सभेस बीड जिल्ह्यातील रिपाइं पदाधिकारी, महिला गायरानधारक, विद्यार्थी, शेतमजूर यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन रिपाइं महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मायाताई मिसळे, सलमा पठाण, रेश्मा जोगदंड, अनिता तुरूकमारे, शोभा गलांडे, माया वाघमारे, पार्वती वरेकर, संगीता जाधव, संगीता गायकवाड, छाया गव्हाणे, मनिषा साळवे, प्रतिक्षा गव्हाणे, जयश्री जाधव, विशाखा जाधव, निशा जावळे, प्रियंका पवार, सुरेखा निर्मळ, जया शिंदे आदींनी केले आहे.

# महाराष्ट्र डिजिटल मीडिया बीड जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल बालाजी जगतकर यांचा परळीत सत्कार

परळी वैजनाथ : महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडिया पत्रकार संघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल पत्रकारितेच्या माध्यमातून विविध सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणारे पत्रकार बालाजी जगतकर यांचा परळी शहरात पत्रकार बांधवांच्या वतीने सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

बालाजी जगतकर यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न, सामाजिक समस्या आणि जनहिताच्या विषयांना सातत्याने प्रसिद्धी देत लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडिया पत्रकार संघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली. या निवडीमुळे पत्रकारिता क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या निवडीनिमित्त परळी येथे आयोजित सत्कार सोहळ्यात ज्येष्ठ पत्रकार आत्मलिंग शेटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष आयुब



पठाण, दत्ता शिवगण, इंजि. शिरीष जगतकर, संजय जगतकर, रावसाहेब जगतकर यांच्यासह अन्य मान्यवर व पत्रकार बांधव उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी बालाजी जगतकर यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील पत्रकारितेच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या. नव्या जबाबदारीच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील पत्रकारांचे प्रश्न, डिजिटल माध्यमांसमोरील आव्हाने आणि जनतेच्या प्रश्नांना अधिक प्रभावीपणे वाचा फोडण्यासाठी जगतकर यांचे कार्य महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# मंत्री रामदास आठवलेंच्या विराट जाहीर सभेस उपस्थित रहा:किसन तांगडे

आपल्या न्याय व हक्कासाठी शक्ती प्रदर्शन करा

बीड/ प्रतिनिधी

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची बीड शहरात शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ठीक ४ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली खालील मागण्याची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी विराट जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.

राज्यासह मराठवाड्यात व बीड जिल्ह्यात पावसाने अडीच महिने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा पाण्याचा व मोल मजुरांच्या पोटापाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पावसाअभावी राज्यभर दुष्काळ जाहीर झाला आहे. दुष्काळ जन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १ लाख रुपये मदत देण्यात यावी. शेतमजूर, कामगार व मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या कुटुंबियांना ५० हजार रुपये मदत जाहीर करण्यात यावी. अनु जातीमधील ५९ जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाची प्रक्रिया रद्द करण्यात यावी. कसत असलेल्या २०११ पर्यंतच्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. महागाई निर्देशांकानुसार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्यात यावी.आदी मागण्याची पूर्तता करण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड शहरात दि. १६ ऑक्टोबर २०२६ शुक्रवार रोजी होणाऱ्या विराट जाहीर सभेस बीड तालुक्यातील रिपाइं पदाधिकारी, गायरान धारक, महिला, शेतमजूर, कामगार यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे.

असे आवाहन रिपाइंचे बीड तालुकाध्यक्ष किसन तांगडे, बापू पवार, सुभाष तांगडे, सतिष शिनगारे, भाऊसाहेब कांबळे, राजू वक्ते, राहुल कांबळे, देवानंद वाघमारे, नामदेव वाघमारे, रतन वाघमारे, भास्कर जावळे,



विशाल इंगोले, अप्पा शेळके, बंडू ठोंबरे, भीमराव घोडेराव, विशाल गव्हाणे, आप्पा पवार, मनोज ससाणे, प्रणव पायाळ, भैय्या वाघमारे, आकाश साबळे, कृष्णा साबळे, संतोष जाधव, अजित सावंत, रविंद्र वीर, नवनाथ डोळस, बबलू सोनवणे, समाधान गवळी, कल्याण सोनवणे, सुशील जावळे, अमोल डावकर, आदींनी केले आहे.

# राज्यातील आणखी १८ तालुक्यांत दुष्काळाच्या तीव्रतेची प्रत्यक्ष पडताळणी होणार

## प्रमुख पाच पिकांचे २० टक्के सर्वेक्षण

### वस्तुनिष्ठ मूल्यमापनातून शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे अधिक अचूक आणि वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्यासाठी शासनाने आणखी १८ तालुक्यांमध्ये दुष्काळाच्या तीव्रतेची प्रत्यक्ष पडताळणी (ग्राऊंड ट्रुथिंग) करण्यास मान्यता दिली आहे. या तालुक्यांतील प्रमुख पाच पिकांचे २० टक्के सर्वेक्षण करण्यात येणार असून, उपग्रह छायाचित्रे व संगणकीय माहितीची प्रत्यक्ष क्षेत्रीय परिस्थितीशी पडताळणी केली जाणार आहे. यामुळे दुष्काळाच्या तीव्रतेचे वास्तव चित्र स्पष्ट होण्यास मदत होणार आहे, याबाबतचा शासन निर्णय मदत व पुनर्वसन विभागाने जारी केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने दुष्काळी परिस्थितीचे अचूक मूल्यमापन करून शेतकऱ्यांना आवश्यक मदत व सवलती उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. खरीप हंगाम २०२६ मधील परिस्थितीच्या आधारे २५ सप्टेंबर

पान २ वर...

# करपलेली पिके आणि करपलेली स्वप्ने..!

# देमनीच्या शिवारात केंद्रीय पथकाने अनुभवली दुष्काळाची दाहकता



छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

शेतात शेतकरी बी पेरतो तेव्हा तो स्वप्ने पेरत असतो. भूमि आणि पाऊस हे त्या स्वप्नांना आकार देत असतात. मात्र भेगाळली भूमि आणि दूरावलेला पाऊस ही पिके आणि शेतकऱ्याची स्वप्नेही करपून टाकतो. दुष्काळाची हीच दाहकता आज केंद्रीय पथकाने अनुभवली. निसर्गाचा कोप म्हणावा तो हाच. राज्यातल्या दुष्काळी स्थितीची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक कालपासून राज्यात आणि छत्रपती संभाजीनगर विभागात आले आहे. कृषी व शेतकरी कल्याण विभागाचे संयुक्त सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय पथकात महालनोबिस राष्ट्रीय पीक

पान २ वर...

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अँड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# पाटोद्यात 'सेवा संकल्प अभियान'; ४६ बालकांवर लघुशस्त्रक्रिया!

## राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचा पुढाकार; बोबडे बोलण्याच्या समस्येतून बालकांना मिळणार दिलासा, पालकांकडून आरोग्य विभागाचे आभार

पाटोदा । प्रतिनिधी

बालकांच्या आरोग्याची काळजी घेत त्यांना निरोगी आणि आत्मविश्वासपूर्ण जीवनाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आरोग्य विभाग पाटोदाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (ठइडघ २.०) अंतर्गत ४६ बालकांवर लघुशस्त्रक्रिया करण्यात आल्या. शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी ग्रामीण रुग्णालय, पाटोदा येथे या विशेष शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमामुळे बालकांच्या उच्चारांशी संबंधित समस्येवर उपचाराची संधी उपलब्ध झाल्याने पालकांनी समाधान व्यक्त करत आरोग्य विभागाचे आभार मानले.

तालुक्यातील विविध शाळांमध्ये शिकणाऱ्या जिभेचा खालचा पडदा लहान असल्यामुळे जीभेच्या हालचालींवर मर्यादा येणाऱ्या आणि त्यामुळे स्पष्ट उच्चार करण्यात अडचण जाणवणाऱ्या बालकांची



या शिबिरासाठी निवड करण्यात आली होती. संबंधित बालकांवर जीभ मोकळी करण्यासाठी लघुशस्त्रक्रिया करण्यात आली. या उपचारांमुळे बालकांना उच्चार अधिक स्पष्ट करण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे.

बालकांच्या आरोग्यासाठी आरोग्य विभागाचा पुढाकार

लहान वयातच बालकांच्या आरोग्यविषयक समस्या ओळखून त्यांच्यावर योग्य उपचार उपलब्ध करून देणे, हा राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचा महत्त्वाचा उद्देश आहे. या अनुषंगाने पाटोदा तालुका आरोग्य विभागाने आयोजित केलेल्या शिबिरामुळे संबंधित बालकांना उपचाराची सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध झाली. बालकांच्या भविष्यातील आरोग्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे.

या शिबिराचे आयोजन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंके, डीआरसीएचओ डॉ. सचिन शेकडे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शेख रौफ, आरएमओ डॉ. एल. आर. तांदळे, डॉ. संजय कदम, जिल्हा कार्यक्रम समन्वयक रमेश तांगडे, उपजिल्हा रुग्णालय पाटोदाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अभिषेक जाधव तसेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नरेश कासट यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

शिबिराच्या यशस्वितेसाठी पाटोदा येथील आरबीएसके पथक, ग्रामीण रुग्णालयातील कर्मचारी आणि सर्व शिक्षा अभियानाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

बालकांच्या आरोग्याशी निगडित समस्या दूर करण्यासाठी आरोग्य विभागाने केलेल्या या प्रयत्नामुळे पालकांमध्ये समाधानाचे वातावरण असून, बालकांच्या निरोगी भविष्याचा संकल्प प्रत्यक्ष कृतीत उतरविणारे हे शिबिर 'सेवा संकल्प अभियानाचे' महत्त्व अधोरेखित करणारे ठरले.



# मुखेड तालुक्यात दुष्काळी सवलती लागू करा; शेकापचा १३ ऑक्टोबर रोजी 'बोंम्ब मारो' आंदोलन

मुखेड / प्रतिनिधी

मुखेड तालुक्याचा समावेश 'ट्रिगर वन'मध्ये करून दुष्काळी सवलती तात्काळ लागू कराव्यात, या प्रमुख मागणीसाठी शेतकरी कामगार पक्षातर्फे (शेकाप) तहसीलदार अभयराज नंजुंडे यांना निवेदन दिले. दि. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी तहसील कार्यालयासमोर भव्य 'बोंम्ब मारो' आंदोलन करण्याचा इशारा शेकापने दिला आहे.

तालुक्याचा समावेश 'ट्रिगर वन'मध्ये करावा यासाठी २ ऑक्टोबरला शेकापच्या वतीने एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले होते. मात्र, या आंदोलनानंतरही प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष केले. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे शेतकर्यांमध्ये तीव्र संताप उसळला असून, त्याविरोधात आता तीव्र आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागल्याचे शेकापने म्हटले आहे. तहसीलदारांना निवेदन देताना शेकापचे मा.जिल्हा चिटणीस भाई ड. गोविंद पाटील डूमणे, पाळाचे उपसरपंच सुभाष पाटील डूमणे, तालुका चिटणीस राजू पाटील सुरनर, बजरंग पाटील जिगळे, बालाजी आईनवाड आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



# पं. कृष्णाजी बोंगाणे यांच्या अभंगवाणीने रंगला भक्तिरसाचा सोहळा

गेवराई (प्रतिनिधी)

माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८९ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित श्रीराम कथा ज्ञानयज्ञ व कीर्तन महोत्सवात पद्मश्री रशिदखाँ यांचे शिष्य पं. कृष्णाजी बोंगाणे यांच्या अभंगवाणीचा सुरेल कार्यक्रम रंगला. आपल्या मधुर आणि भावपूर्ण गायनातून त्यांनी उपस्थित भाविकांना भक्तिरसात चिंब भिजवले.पं. बोंगाणे यांनी विविध भक्तिगीते आणि अभंग सादर करून उपस्थितांची मने जिंकली. 'रूप पाहता लोचनी', 'जय जय रामकृष्ण हरी' यांसह विविध अभंगांना उपस्थित भाविकांनी उत्स्फूर्त दाद दिली. त्यांच्या गायनातील सुरेलता, भावपूर्ण मांडणी आणि भक्तिभाव यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. अभंगाच्या प्रत्येक रचनेला भाविकांकडून टाळ्यांचा कडकडाट आणि उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत होता. त्यामुळे आजच्या अभंगवाणी कार्यक्रमाने रामकथा महोत्सवातील भक्तिरसाला आणखी उंची मिळाली.रोहित खवळे यांनी हार्मोनियमवर तर ओमकार भुसारे यांनी तबल्यावर साथ दिली.

# देवाचे चिंतन करण्यापेक्षा भक्ताचे चिंतन देवाला अधिक प्रिय-भागवताचार्य ह.भ.प.अशोक महाराज भोसले

कै.अनुसयाबाई पोकळे यांच्या तेराव्या विधीनिमित्त कीर्तनसेवा

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) देवाचे चिंतन करणे महत्त्वाचे आहेच; मात्र निस्सीम श्रद्धेने केलेली भक्ती, निःस्वार्थ भावनेने केलेले सत्कर्म आणि भगवंताच्या चरणी समर्पित केलेले जीवन देवाला अधिक प्रिय असते. केवळ सोशल मीडियावर स्टेटस ठेवण्यापेक्षा जीवनात अशी उत्तुंग कामगिरी करा की, इतरांनी आपले स्टेटस ठेवले पाहिजे, असे प्रेरणादायी विचार प्रसिद्ध भागवताचार्य ह.भ.प. अशोक महाराज भोसले यांनी व्यक्त केले.

कै. अनुसया सूर्यभान पोकळे यांच्या तेराव्या विधीनिमित्त आयोजित कीर्तनसेवेत ते बोलत होते. यावेळी जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या 'पवित्र तो देह वाणी पुण्यवंत' या प्रसिद्ध अभंगाचे निरूपण करताना महाराजांनी संतांच्या विचारांचे महत्त्व, भक्तीची खरी व्याख्या आणि निःस्वार्थ सेवाभाव याविषयी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन केले.

कीर्तनातून संत तुकाराम महाराजांच्या जीवनातील तपश्चर्या, त्याग आणि अखंड नामस्मरणाचे महत्त्व विशद करताना ह.भ.प. अशोक महाराज भोसले म्हणाले की, संत तुकाराम महाराजांनी भंडारा, भामचंद्र आणि भोरूडेश्वर या डोंगरांवर अन्न-पाण्याची तमा न बाळगता कठोर तपश्चर्या केली. त्यांनी आपले संपूर्ण जीवन भगवंताच्या नामस्मरणासाठी आणि भक्तिमार्गासाठी समर्पित केले. संतांची भक्ती ही कोणत्याही अपेक्षेने प्रेरित नव्हती, तर ती निःस्वार्थ भावनेतून प्रकट झालेली होती. त्यांचा त्याग, श्रद्धा आणि साधना आजच्या पिढीसाठीही मार्गदर्शक आहेत.

आजच्या कलियुगातील बदलत्या परिस्थितीवर भाष्य करताना महाराज म्हणाले की, पूर्वी संतांनी प्रतिकूल परिस्थितीतही अखंड भजन, कीर्तन आणि नामस्मरण केले. मात्र, आज भजन करणाऱ्याला वेळेवर भोजन मिळाले नाही, तर भजन करण्याची इच्छाही कमी होते, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. यातून भक्तीमधील निष्ठा, समर्पण आणि सहनशीलतेचे महत्त्व अधोरेखित होते. भक्ती ही केवळ सोयीसाठी किंवा दिखाव्यासाठी नसावी, तर ती अंतःकरणातून उमटणारी श्रद्धा असावी.

केवळ बाह्य दिखावा करून किंवा धार्मिक विधी पार पाडून ईश्वरप्राप्ती होत नाही. त्यासाठी मनामध्ये निर्मळ भाव, आचरणात प्रामाणिकपणा आणि जीवनात परोपकाराची भावना असणे आवश्यक आहे. संतांनी दिलेल्या शिकवणीचे आचरण करणे, गरजूंना मदत करणे, इतरांच्या दुःखात सहभागी होणे आणि निःस्वार्थ भावनेने समाजाची सेवा करणे, हीच खरी ईश्वरसेवा आहे, असेही महाराजांनी आपल्या निरूपणातून स्पष्ट केले.

आजच्या सोशल मीडियाच्या युगात व्यक्ती आपल्या कामापेक्षा प्रसिद्धीला अधिक महत्त्व देताना दिसते. मात्र, माणसाने प्रसिद्धीच्या मागे धावण्यापेक्षा आपल्या कार्यातून समाजाच्या मनात स्थान निर्माण केले पाहिजे. आपले कर्तृत्व, विचार आणि सेवाभाव इतके मोठे असावेत की, समाजाने स्वतःहून त्याची दखल घ्यावी. जीवनात चांगले कार्य करून इतरांसाठी प्रेरणादायी बनणे, हाच खऱ्या अर्थाने जीवनाचा गौरव असल्याचा संदेशही त्यांनी दिला.

कै. अनुसया सूर्यभान पोकळे यांच्या तेराव्या विधीनिमित्त आयोजित या कीर्तनसेवेला सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रातील मान्यवरांसह परिसरातील नागरिक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विक्रम पोकळे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, बबनराव पाचपुते, कल्याण पोकळे, संतोष सानप, सचिन रानडे, बन्शीभाऊ पोकळे, सुभाष



थोरवे, चंद्रकांत तुपे सर, प्रा. राम बनसोडे, बबनराव पोकळे, भाऊसाहेब ननवरे, दादा खाडे, बबन पठाडे, पांडुरंग पोकळे, संजय पोकळे, शिवाजी सुरवसे, चंद्रकांत खाडे आणि उत्तम पोकळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कीर्तनसेवेच्या माध्यमातून संतविचार, भक्ती, त्याग आणि सेवाभावाचा संदेश उपस्थित भाविकांपर्यंत पोहोचला. कीर्तनानंतर उपस्थितांनी कै. अनुसयाबाई पोकळे यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली.

# ब्लॅक पँथर मोनू सिंगचे परळीत अभूतपूर्व स्वागत; परळीकरांच्या प्रेमाने भारावला!

## परळीकरांचे स्वागत माझ्या आयुष्यात अविस्मरणीय- मोनू सिंग

परळी (प्रतिनिधी)

आईच्या आरोग्यासाठी केलेला नवस पूर्ण करण्यासाठी बिहारपासून धावत तीर्थयात्रेला निघालेल्या १९ वर्षीय मोनू सिंग ऊर्फ 'मोनू ब्लॅक पँथर' याचे परळी वैजनाथ नगरीत उत्साहात स्वागत करण्यात आले. परळीच्या नगराध्यक्षांच्या हस्ते औक्षण, ढोल-ताशांचा गजर, ठिकठिकाणी हारतुरे देत परळीकरांनी अतिविशिष्ट शिष्टाचारात आतिथ्य करत त्याचे स्वागत केले. या प्रेमळ अकल्पनीय स्वागता मोनू भारावून गेला. बिहार ऊन निघाल्यापासून आजपर्यंतच्या प्रवासात त्याचे कुठेही झाले नसेल एवढे अभूतपूर्व व अविस्मरणीय स्वागत झाल्याची भावविभोर प्रतिक्रिया त्याने यावेळी व्यक्त केली.

आई लालतीदेवी यांची प्रकृती गंभीर असताना, त्या बऱ्या झाल्यास १२ ज्योतिर्लिंग आणि चारधामांची यात्रा धावत पूर्ण करण्याचा संकल्प मोनूने केला होता. आईच्या प्रकृतीत सुधारणा झाल्यानंतर १५ मार्च २०२६ रोजी त्याने पाटणा येथून यात्रेला सुरुवात केली. दररोज सुमारे ५० किलोमीटर धावत तो आपले ध्येय गाठण्यासाठी पुढे जात आहे. सुमारे १७





हजार किलोमीटरच्या या धाडसी प्रवासातील महत्त्वाच्या टप्प्यावर मोनूचे परळी वैजनाथमध्ये आगमन झाले. बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथाच्या नगरीत त्याचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. मोनू सिंगचे परळी तालुक्यात आगमन झाल्यापासून ठिकठिकाणी त्याचे जोरदार स्वागत करण्यात आले. बीड ते परळी रस्त्यावर गावोगावी त्याचे स्वागत झाले. आम्ही परळीकर म्हणून परळीकर नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद देत संत जगमित्र नागा मंदिर ते वैद्यनाथ मंदिर ढोल ताशाच्या गजरात स्वागत यात्रा काढत त्याचे जोरदार स्वागत केले. परळीच्या प्रथम नागरिक नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी व अन्य परळीकर महिलांच्या हस्ते त्याचे औक्षण करण्यात आले. हार तुरे, फेटा, पुष्पगुच्छ,भेटवस्तू, ढोल ताशांचा गजर आशा अतिविशिष्ट शिष्टाचारात मोनु सिंगचे परळीकरांनी आदरातिथ्य केले. बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या प्रभू-वैद्यनाथाची त्याने मनोभावे पूजा करून आपल्या आईसाठी केलेल्या संकलपची पूर्ती पंचम ज्योतिर्लिंगाच्या ठिकाणी केली. परळीकर नागरिकांनी केलेले अभूतपूर्व व अविस्मरणीय स्वागत असुन आपण भारावून गेलो असल्याची भावना यावेळी मोनुसिंग यांने व्यक्त केली. यावेळी मोठ्या संख्येने परळीकर नागरिक उपस्थित होते.

आईच्या आरोग्यासाठी केलेला नवस पूर्ण करण्याची तळमळ, त्यासाठी अथक परिश्रम आणि श्रद्धेच्या बळावर सुरू असलेली धावती यात्रा आहे. यात्रेच्या प्रवासावर निघालेले असताना अनेक ठिकाणी अनेक प्रकारचे अनुभव आले. मात्र महाराष्ट्रात ठीक ठिकाणी मला प्रेम लाभत असून माझ्या आतापर्यंतच्या प्रवासात अभूतपूर्व आणि अविस्मरणीय असे प्रेम परळीकरांनी मला दिले आहे अशी भावविभोर प्रतिक्रिया भारावलेल्या मोनुसिंग यांनी यावेळी व्यक्त केली.

## गळीत हंगामात ऊसदराचा भडका उडणार!

# माजलगावात ऊस परिषद; दरवाढी करिता शेतकरी आक्रमक

**बीड : प्रतिनिधी**

**एल निनोच्या लहरी प्रभावाने यंदा पावसाने पाठ फिरवल्यामुळे आधीच सोयाबीन आणि कापूस ही नगदी पिके शेतकऱ्यांच्या हातातून पूर्णपणे गेली आहेत. बळीराजा दुकाळाच्या छायेत पिचत असताना, आता एकमेव आशेचा किरण उरलेले ऊस पीकही कारखानदारांच्या घशात जाण्याची चिन्हे आहेत. वाढलेला उत्पादन खर्च आणि साखरेचे वधारलेले दर लक्षात घेता, उसाला पहिली उचल ४२५० रुपये आणि अंतिम भाव ५००० रुपये मिळावा, या मागणीसाठी रविवार दि. ११ रोजी माजलगाव येथील मोंढा मैदानावर 'ऊस परिषद' आयोजित करण्यात आली आहे.**

दुष्काळी परिस्थिती व दुसऱ्या बाजूला खते, सिंचन आणि इतर निविष्ठांचा खर्च प्रचंड वाढला आहे. मात्र, याउलट बाजारात साखरेचे भाव कडाडले आहेत. 'रिकव्हरी'मधील गैरप्रकार (चोरी) थांबवून आणि उप-उत्पादनांतून (बाय-प्रॉडक्ट्स) मिळणाऱ्या नफ्याचा योग्य हिस्सा शेतकऱ्यांना मिळणे काळाची गरज आहे. मागील वर्षी उसाच्या दरावरून पेटलेला संघर्ष ताजा असताना, यंदाही साखर कारखानदार आपली असंवेदनशीलता दाखवत आहेत. दुष्काळाच्या या संकटात कारखानदारांनी सकारात्मक भूमिका घेत चर्चेचा मार्ग पत्करायला हवा. मागील वर्षीचा पुनरावृत्ती टाळून शेतकऱ्यांच्या या न्याय मागण्यांसाठी संघर्ष समितीने साखर आयुक्त, साखर सहसंचालक आणि जिल्हाधिकाऱ्यांना प्रत्यक्ष भेटी देऊन निवेदने सादर केली आहेत. परंतु, कारखानदारांची पाठ फिरवण्याची भूमिका अशीच कायम राहिल्यास, यंदाचा संघर्ष अटळ मानला जात आहे.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या या लढ्याला धार देण्यासाठी आणि पुढील संघर्षाची अंतिम रूपरेषा ठरवण्यासाठी रविवार दि ११ रोजी माजलगावच्या मोंढा मैदानावर मोठ्या संख्येने शेतकरी एकवटणार आहेत. ४२५० रुपयांच्या पहिल्या उचलीवर शेतकरी ठाम असून, साखर कारखानदारांनी वेळीच पुढाकार न घेतल्यास तीव्र आंदोलनाचे लोन संपूर्ण जिल्ह्यात पसरण्याचा इशारा या वेळी दिला जाण्याची शक्यता आहे.यंदाच्या गळीत हंगामात कारखानदार आणि शेतकरी यांच्यातील हा संघर्ष टाळण्यासाठी प्रशासन व कारखानदार काय भूमिका घेतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. या परिषदेकरिता कॉ.उमेश देशमुख, कॉ.राजन क्षीरसागर यांच्यासह ऊस उत्पादक युवा शेतकरी संघर्ष समितीचे विविध पदाधिकारी उपस्थित राहणार असून ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी या परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.



# लोकनेते आ.सुरेश अण्णा धस यांच्या शुभहस्ते कपिल (चिंटूशेठ) अग्रवाल यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) लोकनेते तथा मराठवाडा भूषण आमदार सुरेश अण्णा धस यांचे कट्टर समर्थक आणि मुर्शदपूर, कासारी व शिदेवाडी ग्रामपंचायतींचे सदस्य कपिल (चिंटूशेठ) अग्रवाल यांचा शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी वाढदिवस उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या वाढदिवसानिमित्त लोकनेते आ. सुरेश अण्णा धस यांनी कपिल (चिंटूशेठ) अग्रवाल यांचा सत्कार करून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या प्रसंगामुळे अग्रवाल यांच्यासाठी हा वाढदिवस विशेष ठरला.

आष्टी विधानसभा मतदारसंघाच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात लोकनेते आ. सुरेश अण्णा धस यांचे समर्थक म्हणून कपिल (चिंटूशेठ) अग्रवाल यांची ओळख आहे. आ. धस यांच्याविषयी असलेली निष्ठा आणि त्यांच्याशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध यामुळे अग्रवाल यांचा वाढदिवस हा त्यांच्या समर्थकांसाठी आनंदाचा क्षण ठरला. वाढदिवसानिमित्त आ. सुरेश अण्णा धस यांनी स्वतः त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्याने या प्रसंगाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

कपिल (चिंटूशेठ) अग्रवाल हे मुर्शदपूर, कासारी व शिदेवाडी ग्रामपंचायतींचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. ग्रामपंचायत स्तरावरील सार्वजनिक जीवनात सदस्य म्हणून त्यांचा सहभाग आहे. ग्रामीण भागातील राजकीय आणि सामाजिक घडामोडींमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींची भूमिका महत्त्वाची मानली जाते. ग्रामपंचायत सदस्य म्हणून काम करताना नागरिकांच्या अपेक्षा, स्थानिक प्रश्न आणि गावांच्या विकासाशी संबंधित बाबी समजून घेण्याची जबाबदारी लोकप्रतिनिधींवर असते. या पार्श्वभूमीवर कपिल (चिंटूशेठ) अग्रवाल यांना वाढदिवसानिमित्त मिळालेल्या शुभेच्छा आणि सत्कारामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. लोकनेते आ. सुरेश अण्णा धस यांच्या हस्ते झालेला हा सत्कार त्यांच्या वाढदिवसातील महत्त्वाचा क्षण ठरला.

वाढदिवस हा प्रत्येकाच्या आयुष्यातील आनंदाचा आणि नव्या संकल्पांचा दिवस असतो. या दिवशी कुटुंबीय, मित्रपरिवार, सहकारी आणि हितचिंतकांकडून मिळणाऱ्या शुभेच्छांमुळे आनंद द्विगुणित होतो. त्यातच राजकीय क्षेत्रातील मार्गदर्शक आणि नेत्याकडून मिळणाऱ्या शुभेच्छा या संबंधित व्यक्तीसाठी विशेष आनंद देणाऱ्या ठरतात. कपिल (चिंटूशेठ) अग्रवाल यांच्या वाढदिवसानिमित्त आ. सुरेश अण्णा धस यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्याने हा सोहळा त्यांच्या दृष्टीने संस्मरणीय ठरला.

वाढदिवसानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, सुख-समृद्धी आणि भावी वाटचालीत यश लाभावे, अशा सदिच्छा व्यक्त करण्यात आल्या.

लोकनेते आ. सुरेश अण्णा धस यांच्या हस्ते सत्कार झाल्याची बाब कपिल (चिंटूशेठ) अग्रवाल यांच्या समर्थकांसाठी आनंदाची ठरली. वाढदिवसानिमित्त त्यांच्यावर मित्रपरिवार, सहकारी आणि हितचिंतकांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यांच्या आगामी वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत. लोकनेते आ. सुरेश अण्णा धस यांच्या हस्ते झालेला सत्कार आणि वाढदिवसानिमित्त मिळालेल्या शुभेच्छांमुळे कपिल (चिंटूशेठ) अग्रवाल यांचा वाढदिवस विशेष ठरला.

# माळरानावर मुरूम माफियांचा घाला; प्रशासनाचे दुर्लक्ष?

## अंतरगावच्या माळरानावर मुरूम माफियांचा घाला!

बेकायदा उत्खननामुळे परिसराची वाट लागली; महसूल विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

नायगाव तालुक्यातील अंतरगाव परिसरातील माळरानावर मुरूम माफियांनी कथितपणे मोठ्या प्रमाणात उत्खनन सुरू केल्याने परिसराच्या नैसर्गिक स्वरूपाला धोका निर्माण झाला आहे. मुरूमाच्या उत्खननासाठी माळरानावर मोठमोठे खड्डे पाडण्यात आल्याने जमीन विद्रूप झाली असून, या प्रकाराकडे संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये आहे.

माळरान हे गावाच्या पर्यावरणीय समतोलासाठी महत्त्वाचे असताना त्याच ठिकाणी मोठ्या प्रमाणात मुरूम उपसा होत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. उत्खननामुळे पावसाचे पाणी साठवण्याची नैसर्गिक क्षमता कमी होण्याबरोबरच मातीची धूप आणि परिसराच्या पर्यावरणावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

विशेष म्हणजे, मुरूम उत्खननासाठी आवश्यक परवानग्या आहेत का, उत्खननाचे प्रमाण नियमानुसार आहे का आणि शासनाचा महसूल भरला जात आहे का, याची प्रशासनाने तातडीने तपासणी करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

माळरानावर दिवसाढवळ्या उत्खनन सुरू असल्याच्या तक्रारी असतानाही संबंधित विभागाकडून ठोस कारवाई होत नसल्यास या प्रकाराला अप्रत्यक्ष पाठबळ मिळत असल्याचा सवाल उपस्थित केला जात आहे. त्यामुळे नायगाव घ्या तहसिलदार डॉ .धमप्रिया गायकवाड व मंडळी अधिकारी व तलाठी

विभागाने घटनास्थळी पाहणी करून उत्खननाची चौकशी करावी आणि नियमबाह्य उत्खनन आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

माळरान वाचविण्यासाठी प्रशासन आता तरी जागे होणार का? असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे

# नरसीतील वाढत्या चोऱ्यांनी पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह..!

## भरदिवसा ३ लाख ८० हजारांची रोकड आणि दीड तोळे सोने लंपास, रामतीर्थ पोलीस ठाण्याला सक्षम नेतृत्वाची गरज



नरसी (प्रतिनिधी)

रामतीर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नरसी परिसरात भरदिवसा घरफोडी करून ३ लाख ८० हजार रुपयांची रोकड आणि प्रत्येकी पाच ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या तीन अंगठ्या असा ऐवज चोरून नेण्यात आला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, पोलिसांच्या गस्तीवर आणि गुन्हे प्रतिबंधक उपाययोजनांवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

गुरुवारी दुपारी दीड ते दोन वाजण्याच्या सुमारास राणी लक्ष्मीबाई हायस्कूलकडे जाणाऱ्या रस्त्यावरील प्रभाकर कोंडीबा गायकवाड यांच्या घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी कपाटातील बांधकामासाठी ठेवलेली रोकड आणि सोन्याच्या अंगठ्या लंपास केल्या. गायकवाड यांच्या घराचे बांधकाम सुरू असून, ते देखरेखीसाठी शेजाऱ्यांच्या घरात भाड्याने राहत होते. घटनेच्या दिवशी ते बाहेरगावी गेले होते, तर त्यांची पत्नी नोकरीनिमित्त कामावर गेल्या होत्या. घरात कोणी नसल्याची संधी साधून चोरी झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

घटनेची माहिती मिळताच रामतीर्थ पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली. चोरट्यांचा माग काढण्यासाठी श्वानपथकही दाखल झाले. मात्र, आरोपींचा शोध लागल्याची अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

गस्तीचे नियोजन आणि तपासावर लक्ष देण्याची गरज..वर्दळीच्या परिसरात भरदिवसा लाखोंची चोरी होणे ही गंभीर बाब आहे. चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी नियमित गस्त, संशयितांच्या हालचालींवर लक्ष आणि सीसीटीव्ही फुटेजची तपासणी प्रभावीपणे होणे आवश्यक आहे. रामतीर्थ पोलीस ठाण्याच्या कार्यपद्धतीचा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आढावा घेऊन सक्षम नेतृत्वाखाली गुन्हेगारीवर वचक निर्माण करावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.चोरीला गेलेली रोकड आणि सोन्याच्या अंगठ्या हस्तगत करून आरोपींना तातडीने अटक करण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. नागरिकांना केवळ तपासाचे आश्वासन नव्हे, तर सुरक्षिततेची हमी हवी आहे! त्यामुळे नरसीतील चोरीचा तातडीने छडा लावून रामतीर्थ पोलिसांनी आपल्या कार्यक्षमतेतून विश्वास निर्माण करावा, अशी मागणी होत आहे.

# एसटीच्या अतिरिक्त जमिनींच्या व्यावसायिक विकासाला वेग - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

## पीपीपी तत्वावर विकासातून एसटीला भरीव उत्पन्नाचा नवा स्रोत, प्रत्येक जागेसाठी स्वतंत्र निविदा बंधनकारक

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताब्यातील अतिरिक्त जमिनींचा अधिकाधिक व्यावसायिक वापर करून महामंडळाचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. एसटी महामंडळाच्या अतिरिक्त जमिनींचा सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर विकास करण्यास आणि त्यासाठी ४९+४९ वर्ष असा एकूण ९८ वर्षांपर्यंतचा भाडेपट्टा करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे एसटीच्या मालमत्तेतून नियमित व दीर्घकालीन उत्पन्न मिळविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली या प्रक्रियेसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या निर्णयामुळे एसटीच्या आर्थिक बळकटीकरणाला मोठी चालना मिळणार असून, महामंडळाच्या जमिनींचा नियोजनबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने व्यावसायिक वापर करता येणार आहे.

शासन निर्णयानुसार, एसटी महामंडळाच्या स्वमालकीच्या, भूसंपादनातून संपादित, पूर्वीच्या रोड ट्रान्सपोर्ट विभागाकडून हस्तांतरित, भाडेकरारावरील तसेच बक्षीसपत्राद्वारे प्राप्त अशा विविध प्रकारच्या जमिनींवर पीपीपी अंतर्गत विकास प्रकल्प राबविता येणार आहेत.

प्रत्येक जागेसाठी स्वतंत्र निविदा बंधनकारक..

पीपीपी तत्वावरील विकासासाठी अंतिम टप्प्यात असलेल्या व्यवहार्य प्रकल्पांना महाराष्ट्र सार्वजनिक-खासगी भागीदारी धोरण, २०२६ अंतर्गत काही सवलती देण्याची तरतूदही करण्यात आली आहे. प्रकल्पाच्या निविदा, सवलत करारनामा आणि व्यवहार्य संरचनेसाठी संबंधित समितीची मान्यता घेण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक प्रकल्पाच्या अंतिम निविदेला मुख्यमंत्री स्तरावर मान्यता घेणे बंधनकारक राहणार आहे.

उत्पन्न वाढविण्यासाठी 'अपफ्रंट प्रीमियम' मॉडेल..

एसटी महामंडळाच्या आर्थिक स्थितीचा विचार करून, दीर्घकालीन भाडेकरारापेक्षा अपफ्रंट प्रीमियमसह ९० वर्षांचा लीज मॉडेल महामंडळासाठी अधिक फायदेशीर ठरू शकतो, अशी शिफारस सुबोधकुमार समितीने केली होती. त्यानंतर शासनाने भाडेपट्ट्याचा कालावधी वाढवून (४९+४९) ९८ वर्षांपर्यंत करण्यास मान्यता दिली आहे.

महामंडळाच्या राज्यभरातील सुमारे ८५० ठिकाणी ३५०० एकरांपेक्षा अधिक जमीन उपलब्ध आहे. यातील मोठ्या प्रमाणातील जमीनी मोक्याच्या ठिकाणी आहे.

या जमिनींचा व्यापारी, निवासी, औद्योगिक तसेच अन्य व्यावसायिक कारणांसाठी नियोजनबद्ध विकास केल्यास महामंडळाला आगावू प्रीमियम सह मोठ्या प्रमाणावर नियमित उत्पन्न मिळू शकते. तसेच व्यवसायिक संकुलात देखील महामंडळाला हिस्सा मिळणार असल्याने त्यातून नियमित वार्षिक उत्पन्न देखील महामंडळाला प्राप्त होणार आहे.

याबाबत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, एसटी महामंडळाच्या मालकीच्या जमिनी हा महामंडळाचा मौल्यवान ठेवा आहे. या जमिनींचा विनियोग केवळ तात्पुरत्या उत्पन्नासाठी नव्हे, तर एसटीच्या दीर्घकालीन आर्थिक सक्षमीकरणासाठी करण्यात येणार आहे. पारदर्शक निविदा प्रक्रिया, योग्य व्यावसायिक नियोजन आणि पीपीपी तत्वाच्या माध्यमातून या मालमत्तेतून महामंडळाला अधिकाधिक उत्पन्न मिळवून देणे हा आमचा प्रमुख उद्देश आहे.

एसटीच्या प्रवासी सेवेला अधिक सक्षम करण्यासाठी आर्थिक स्वावलंबन आवश्यक आहे. त्यामुळे महामंडळाच्या अतिरिक्त जमिनींचा योग्य पद्धतीने विकास करून त्यातून मिळणारे उत्पन्न एसटीच्या सेवा-सुविधांच्या बळकटीकरणासाठी उपयोगात आणले जाईल, असेही मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.

# 'कोण होणार करोडपती'चा भव्य शुभारंभ



## माधुरी दीक्षित आणि सोनाली बेंद्रे पहिल्यांदाच एकाच मंचावर..!

मनमोकळ्या गप्पा, जुन्या आठवणी आणि सामाजिक कार्याला पाठिंबा, १२ ऑक्टोबरला रंगणार विशेष भाग

मुंबई । प्रतिनिधी

सोनी मराठीवरील लोकप्रिय कार्यक्रम 'कोण होणार करोडपती'च्या नव्या पर्वाचा शुभारंभ सोमवार, १२ ऑक्टोबर रोजी रात्री ९ वाजता होणार आहे. यंदा अभिनेत्री माधुरी दीक्षित सूत्रसंचालकाच्या भूमिकेत असून, शुभारंभाच्या विशेष भागात अभिनेत्री सोनाली बेंद्रे हॉटसीटवर विराजमान होणार आहे. हा कार्यक्रम सोनी मराठी आणि सोनी लिव्हवर पाहता येणार आहे.

माधुरी दीक्षित आणि सोनाली बेंद्रे यांनी आजवर कोणत्याही चित्रपटात एकत्र काम केलेले नाही. त्यामुळे पहिल्यांदाच एकाच मंचावर आलेल्या या दोन लोकप्रिय अभिनेत्रींच्या मनमोकळ्या गप्पा, जुन्या आठवणी आणि आयुष्यातील खास किस्से प्रेक्षकांसाठी आकर्षण ठरणार आहेत.

या विशेष भागात सोनाली बेंद्रे प्राण्यांच्या कल्याणासाठी कार्यरत असलेल्या हॅपी पेट फाउंडेशन या संस्थेला पाठिंबा देण्यासाठी खेळणार आहे. तसेच ती आपल्या 'हॅपी पॉडकास्ट' उपक्रमाबद्दलही माहिती देणार आहे. घरातील जबाबदाऱ्यांचे नियोजन आणि कुटुंबातील सहकार्य याविषयी माधुरी आणि सोनाली यांच्यात रंगतदार चर्चा होणार आहे. यावेळी सोनालीने आपल्या सासूबाई तिला स्वयंपाकघरात काम करू देत नसल्याचा गमतीशीर खुलासाही केला.

माधुरी दीक्षितने सोनालीसोबत एकाच मंचावर येण्याचा आनंद व्यक्त केला. तर सोनाली बेंद्रेने माधुरीच्या सूत्रसंचालनाचे कौतुक करत ती प्रेमळ आणि आपुलकीने वागणारी व्यक्ती असल्याचे सांगितले. माधुरीच्या अभिनयासोबतच तिच्या नृत्याचीही आपण चाहती असल्याचे सोनालीने नमूद केले.

मनोरंजन, मैत्री, जुन्या आठवणी आणि सामाजिक बांधिलकीचा संगम असलेला 'कोण होणार करोडपती'चा हा विशेष भाग सोमवार, १२ ऑक्टोबर रोजी रात्री ९ वाजता सोनी मराठी आणि सोनी लिव्हवर पाहायला मिळणार आहे.

छायाचित्रकार : रमाकांत मुंडे, मुंबई

# तात्या-आभई आदर्श प्रतिष्ठानतर्फे उद्या शनिवारी सहा मान्यवरांचा गौरव

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

**काही माणसे पुरस्काराने मोठी होत नाहीत; तर त्यांच्या कार्यामुळे पुरस्काराचीच प्रतिष्ठा वाढते. समाजासाठी प्रामाणिकपणे, निस्वार्थ भावनेने आणि सातत्याने योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव होणे ही समाजाची जबाबदारी आहे, या भावनेतून तात्या-आभई आदर्श प्रतिष्ठान, अंबाजोगाई यांच्या वतीने अभाई याच्या वतीन कै. ड. अण्णासाहेब लोमटे (नवाब) यांच्या स्मृतीप्रित्यर्थ तात्या- आभई आदर्श गौरव पुरस्कार-२०२६ प्रदान करण्यात येणार आहेत. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सहा मान्यवरांची या पुरस्कारांसाठी निवड करण्यात आली असून, त्यांचा उद्या शनिवारी आयोजित करण्यात आलेल्या विशेष सोहळ्यात गौरव करण्यात येणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे ड. राजेंद्रप्रसाद धायगुडे यांनी दिली.**

विधी, आरोग्य, शिक्षण, पत्रकारिता,समाजसेवा आणि संघर्षमय जीवनप्रवास अशा विविध क्षेत्रांत आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या व्यक्तींची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.पुरस्काराच्या माध्यमातून केवळ व्यक्तींचा सन्मान न करता त्यांच्या कार्यामागील सामाजिक बांधिलकी, संघर्ष, प्रामाणिकपणा आणि समाजहिताची भावना अधोरेखित करण्याचा प्रतिष्ठानचा प्रयत्न असल्याचे सांगण्यात आले.विधी सेवा गौरव पुरस्कारासाठी ज्येष्ठ विधिज्ञ ड. सुरेश राजारामपंत सोनवळकर, अंबाजोगाई यांची निवड करण्यात आली आहे. सन १९८६ पासून ते वकिली क्षेत्रात कार्यरत असून, न्याय, प्रामाणिकपणा, कायद्याचे भान आणि कायद्याचे भान आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांना त्यांनी आपल्या कार्यातून सातत्याने महत्त्व दिले आहे. विधी क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव आणि समाजाप्रती असलेल्या त्यांच्या योगदानाची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

आरोग्य सेवा गौरव

पुरस्कार बालहृदय उपचार क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल डॉ. पंकज भास्करराव सुगावकर (जोशी), पुणे यांना प्रदान करण्यात येणार आहे. वैद्यकीय क्षेत्रातील आपल्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा उपयोग अनेक बालकांच्या उपचारासाठी करतानात्यांच्या कुटुंबांना त्याच्या कुटुंबाना मानसिक आधार आणि आशेचा किरण देण्याचे कार्य त्यांनी केले आहे. बालहदय उपचार क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल घेत प्रतिष्ठानच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात येणार आहे.शिक्षण सेवा गौरव पुरस्कार प्रा. डॉ. मुरलीधर अत्युतराव लहाडे, बनसारोळा यांना प्रदान करण्यात येणार आहे. सामान्य परिस्थितीतून पुढे येत ज्ञानदानाला समाजसेवेचे व्रत मानणाऱ्या प्रा. डॉ. लहाडे यांनी गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरणा देण्याचे आणि त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला दिशा देण्याचे कार्य केले आहे. शिक्षण हे केवळ

नोकरीचे साधन नसून

समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, या विचारातून त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव या पुरस्काराच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.पत्रकारिता सेवा गौरव पुरस्कार पत्रकार परमेश्वर भगवानराव गिते, अंबाजोगाई यांना प्रदान करण्यात येणार आहे. अंबाजोगाईच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि सार्वजनिक जीवनातील विविध घडामोडींना आपल्या लेखणीतून व्यापक व्यासपीठ मिळवून देण्याचे कार्य त्यांनी केले आहे. प्रतिकूल परिस्थितीत पत्रकारिता क्षेत्रात सातत्याने कार्यरत राहूनसामाजिक प्रश्न, नागरिकांच्या समस्या, विकासाचे विषय आणि सार्वजनिक जीवनातील घडामोडींना वृत्तपत्राच्या माध्यमातून स्थान देण्याच्या त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली आहे. समाजसेवा व प्रशासकीय कार्यातील उल्लेखनीय योगदानाबद्दल गजानन तात्यासाहेब चौगुले यांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे. प्रदीर्घ शासकीय सेवेसोबतच युवकांना शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. अनेक कुटुंबांना स्वावलंबी होण्यासाठी मदत करत सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्य त्यांनी केले आहे. प्रशासनातील अनुभवाचा उपयोग समाजहितासाठी करण्याच्या त्यांच्या योगदानाचा या निमित्ताने सन्मान करण्यात येणार आहे. तर विशेष सन्मान बबनराव लक्ष्मणराव बंडगर, अंबाजोगाई यांना प्रदान करण्यात येणार आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करत स्वतःचे विश्व उभे करणाऱ्या बंडगर यांचा जीवनप्रवास प्रेरणादायी आहे. संघर्ष, जिद्द, मेहनत आणि सामाजिक जाणीव यांच्या बळावर त्यांनी सामाजिक व सार्वजनिक जीवनात आपले योगदान दिले. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून उभे राहण्याची प्रेरणा त्यांच्या जीवनप्रवासातून मिळते, त्यामुळे त्यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

कै. ड. अण्णासाहेब लोमटे (नवाब) यांच्या स्मृतीला अभिवादन करत त्यांच्या सामाजिक विचारांची आणि कार्याची प्रेरणा पुढे नेण्याच्या उद्देशाने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात जन करण्यात आले आहे.पुरस्कार स्वीकारणाऱ्या सहाही मान्यवरांच्या कार्याचा गौरव करताना समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींना प्रोत्साहन देण्याची परंपरा अधिक दृढ होईल, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

# आ.सुरेश आण्णा धस यांच्या प्रयत्नांतून दोन रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधीतून १ लाख २० हजारांची मदत मंजूर

संकटसमयी धावून येणारे नेतृत्व

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आजारपणाचे संकट ओढवले की रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांसमोर उपचारांच्या खर्चाचा मोठा प्रश्न उभा राहतो. विशेषतः आर्थिक परिस्थिती हलाखीची असलेल्या कुटुंबांना महागड्या वैद्यकीय उपचारांचा खर्च पेलणे कठीण होते. अशा परिस्थितीत गरजू रुग्णांना आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी लोकनेते तथा आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. याच प्रयत्नांना यश आले असून, मुख्यमंत्री सहायता निधीतून आष्टी तालुक्यातील दोन गरजू रुग्णांना एकूण १ लाख २० हजार रुपयांची वैद्यकीय मदत मंजूर झाली आहे. त्यामुळे संबंधित रुग्णांना उपचारांसाठी मोठा आर्थिक आधार मिळणार आहे.

आष्टी तालुक्यातील शेरी बुद्रुक येथील श्रीमती अनिता सतीश गोरे यांना किडनीवरील उपचारांसाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून ७० हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे. तसेच निमगाव चोभा येथील आस्राजी गाडे यांच्या वैद्यकीय उपचारांसाठी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाली आहे. या दोन्ही रुग्णांना मिळून १ लाख २० हजार रुपयांची मदत उपलब्ध झाल्याने त्यांच्या उपचारांच्या खर्चाचा काही प्रमाणात भार हलका होण्यास मदत होणार आहे.

गंभीर आजारांवरील उपचारांसाठी अनेकदा मोठ्या प्रमाणात पैशांची आवश्यकता असते. आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्यामुळे अनेक रुग्णांना वेळेवर उपचार घेण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागतो. अशा रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून आर्थिक मदत मिळवून देणे ही महत्त्वाची बाब ठरत आहे. आमदार सुरेश आण्णा धस यांच्या पुढाकारातून मतदारसंघातील गरजू रुग्णांना वैद्यकीय उपचारांसाठी मदत मिळावी, यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत.

रुग्णांच्या वैद्यकीय गरजा लक्षात घेऊन त्यांची प्रकरणे संबंधित यंत्रणेकडे सादर करणे, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी मार्गदर्शन करणे आणि मदत मंजूर होण्यासाठी पाठपुरावा करणे, अशा विविध माध्यमांतून रुग्णसेवेचे काम केले जात आहे. त्यामुळे आर्थिक अडचणींमुळे उपचारांसाठी संघर्ष करणाऱ्या कुटुंबांना आधार मिळत आहे.

आमदार सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून गरजू रुग्णांना शासकीय मदत मिळवून देण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने रुग्णसेवा यंत्रणा कार्यरत आहे. मुंबई येथे प्रमोद वाघ हे रुग्णसेवेची जबाबदारी सांभाळत असून, पुणे आणि अहिल्यानगर परिसरात अमर वाळके, दत्ता हुले, शरद रेडेकर आणि विकास साळवे हे स्थानिक पातळीवर रुग्णसेवक म्हणून कार्यरत आहेत.

या रुग्णसेवकांच्या माध्यमातून गरजू रुग्णांची माहिती संकलित करणे, त्यांच्या उपचारांसंदर्भातील प्रकरणे संबंधित यंत्रणेपर्यंत पोहोचवणे, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी मदत करणे आणि मुख्यमंत्री सहायता निधीतून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणे, अशी विविध कामे केली जात आहेत. रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांना आवश्यक ते मार्गदर्शन मिळावे, तसेच मदत मिळविण्याच्या प्रक्रियेत त्यांना सहकार्य व्हावे, यासाठी ही यंत्रणा प्रयत्नशील आहे.

राजकारण हे केवळ विकासकामे आणि सार्वजनिक प्रश्नांपुरते मर्यादित न राहता, संकटात सापडलेल्या नागरिकांना आधार देण्याचे प्रभावी माध्यम ठरू शकते. आजारपणामुळे अडचणीत आलेल्या कुटुंबांना आर्थिक मदत मिळवून देणे, त्यांच्या उपचारांसाठी प्रयत्न करणे आणि त्यांना संकटातून बाहेर पडण्यासाठी सहकार्य करणे,



ही सामाजिक बांधिलकीची महत्त्वाची बाजू आहे.

आमदार सुरेश आण्णा धस यांच्या प्रयत्नांतून मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून दोन रुग्णांना मंजूर झालेली ही मदत त्याचेच उदाहरण ठरत आहे. आर्थिक अडचणींमुळे उपचारांचा खर्च भागविणे कठीण झालेल्या रुग्णांसाठी अशा प्रकारची मदत आशेचा किरण ठरते. रुग्णसेवेसाठी कार्यरत असलेली यंत्रणा आणि गरजू नागरिकांना मदत मिळवून देण्यासाठी केला जाणारा सातत्यपूर्ण पाठपुरावा यामुळे अनेक कुटुंबांना दिलासा मिळण्यास मदत होत आहे.

आजारपणाच्या संकटात आर्थिक विवंचनेत सापडलेल्या रुग्णांना उपचारांसाठी मदतीचा हात देणारे नेतृत्व आणि त्यासाठी सातत्याने कार्यरत असलेली रुग्णसेवा यंत्रणा, यामुळे आष्टी विधानसभा मतदारसंघात गरजू रुग्णांना दिलासा मिळत आहे. शेरी बुद्रुक येथील अनिता सतीश गोरे आणि निमगाव चोभा येथील आस्राजी गाडे यांना मंजूर झालेली एकूण १ लाख २० हजार रुपयांची मदत त्यांच्या उपचारांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# तामसात सार्वजनिक मुताऱ्यांचा अभाव; महिला-मुलींची मोठी गैरसोय

## तामसात सार्वजनिक मुतारीच नाही; महिला-मुलींची मोठी गैरसोय

तामसा : (प्रतिनिधी)

नांदेड जिल्ह्यातील महत्त्वाची बाजारपेठ म्हणून ओळख असलेल्या तामसा शहराची लोकसंख्या सुमारे २५ हजारांच्या घरात असून, दररोज परिसरातील जवळपास ५० गावांतील नागरिकांचा विविध कामानिमित्त तामसा येथे संपर्क असतो. मात्र एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात सार्वजनिक मुतारी आणि स्वच्छतागृहांची पुरेशी सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

तामसा येथील जुन्या बसस्थानक परिसरात एक सुलभ शौचालय व मुतारीची सुविधा आहे. मात्र शहरातील इतर प्रमुख ठिकाणी सार्वजनिक मुतारीची व्यवस्था नसल्याचे चित्र आहे. विशेषतः महिला व मुलींसाठी ही समस्या अधिक गंभीर बनली आहे.

तामसा बसस्थानक परिसरातही



महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची सुविधा नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. बाजारपेठेत खरेदीसाठी अथवा विविध शासकीय व खासगी कामांसाठी येणाऱ्या महिला आणि मुलींना लघुशंकेसाठी आडोसा शोधण्याची वेळ येत आहे. अनेकदा उघड्यावर लघुशंका करण्याची वेळ येत असल्याने महिलांच्या सुरक्षिततेसह त्यांच्या मूलभूत गरजांकडेही दुर्लक्ष होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

तामसा हे परिसरातील नागरिकांसाठी प्रमुख बाजारपेठेचे ठिकाण असून, ग्रामीण भागातून येणाऱ्या महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि प्रवाशांची संख्या मोठी आहे. अशा परिस्थितीत शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठ, बसस्थानक आणि गर्दीच्या ठिकाणी स्वच्छ, सुरक्षित व स्वतंत्र सार्वजनिक स्वच्छतागृहांची उभारणी करणे गरजेचे आहे.

'स्वच्छ भारत'चा संदेश देताना प्रत्यक्षात सार्वजनिक स्वच्छतागृहांची सुविधा मात्र अपुरी राहणे, ही नागरिकांसाठी चिंतेची बाब आहे. संबंधित ग्रामपंचायत व प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तामसा शहरात ठिकठिकाणी सार्वजनिक मुतारी व महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे..चोकट

ग्रामीण भागातून येणाऱ्या मुलींच्या सोयसुविधा नसल्याने मोठी कुंचुम्बना होत आहे विद्यार्थिनींना बस स्थानकात बसची वाट पाहताना तासोन तास वाट पाहावं लागत असून नैसर्गिक क्रिया साठी सुलभ शौचालया स्वच्छतागृह बस स्थानकात नसल्याने मोठी गैरसोयी होत आहे..



# मुक्रमाबाद पोलीस ठाणे मार्फत सायबर सुरक्षा संदर्भात विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन

मुक्रमाबाद । प्रतिनिधी

मुक्रमाबाद येथील पोलीस स्टेशन व स्वामी विवेकानंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने, स्वामी विवेकानंद महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'सायबर सुरक्षा महिना' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या आयोजनात प्राचार्य डॉ.विवेक इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.एस.एल. सकनुरे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून मुक्रमाबाद पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक मा.शंकर मोरे साहेब उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.आर.बी.मादळे यांनी केले. राष्ट्रीय सायबर सुरक्षानिमित्त, सायबर सुरक्षा विषयावर विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन करतांना मा.शंकर मोरे साहेब यांनी आजच्या काळात सायबर सेक्युरिटी च्या संदर्भामध्ये विद्यार्थ्यांनी खूप मोठ्या प्रमाणात काळजी घेणे गरजेचे आहे.आपले मोबाईल हाताळताना व्यवस्थितपणे व आवश्यक त्या साईट मोबाईल मध्ये हाताळणे गरजेचे आहे चुकीच्या लोकांना ओटीपी देता येत नाही या संदर्भात काळजी घ्यावे व जर आपण चुकून सायबर च्या जाळ्यात अडकलो तर किंवा आपले पैसे गेले तर लगेच १९३० या क्रमांकाला डायल करून माहिती कळवावी आपले गेलेले पैसे परत मिळतील अशी माहिती दिली. यावेळी महाविद्यालयातील ग्रंथपाल डॉ.विलास पवार,संरक्षण शास्त्राचे प्रा.भारतभूषण बाळबुधे, डॉ.आर.एम.बिडवे, डॉ.मा.म.गायकवाड,डॉ.डी. एम.काळे, ग्रंथपाल पी.एम. कानगुले तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सलगरा-बेटमोगरा रस्त्याची अत्यंत दुरवस्था, प्रवाशांसह नागरिकांचे हाल

### अनेक वर्षांपासून रस्ता 'जैसे थे' अपघाताचा धोका वाढला,तातडीने दुरुस्ती करण्याची ग्रामस्थांची मागणी

मुखेड । प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील सलगरा ते बेटमोगरा या महत्त्वाच्या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असून,या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांना व नागरिकांना दररोज मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.सलगरा येथून बावलगाव,धामणगाव,डोंगरगाव यांसह शंकरनगर मार्गे देगलूरकडे जाण्यासाठी हा रस्ता अतिशय महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग मानला जातो.मात्र,प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या रस्त्याची दुरवस्था झाली असून,संबंधित यंत्रणेने तातडीने लक्ष देऊन दुरुस्तीचे काम सुरू करावे,अशी जोरदार मागणी परिसरातील ग्रामस्थांमधून होत आहे.मुखेड तालुक्यातील बहुतांश गावांना जोडणाऱ्या रस्त्यांची कामे वेगाने सुरू असल्याचा दावा केला जात असला,तरी सलगरा-बेटमोगरा रस्त्याची परिस्थिती मात्र मागील अनेक वर्षांपासून 'जैसे थे' आहे. रस्त्यावर पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना कसरत करावी लागत असून,या मार्गावर गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे नियमित प्रवास करणाऱ्या नागरिकांमध्ये व वाहनधारकांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

ग्रामीण भागाच्या विकासात आणि दळणवळणात रस्त्यांची भूमिका महत्त्वाची असते.दैनंदिन कामानिमित्त बाहेर पडणारे नागरिक,शेतमाल बाजारात नेणारे शेतकरी आणि शाळेत जाणारे विद्यार्थी यांना याच मार्गाचा अवलंब करावा लागतो.परंतु रस्त्याच्या दुरावस्थेमुळे सर्वांनाच नाहक मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे.त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ या रस्त्याची पाहणी करून डांबरीकरण व दुरुस्तीचे काम हाती घ्यावे,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.सलगरा-बेटमोगरा रस्त्याच्या प्रलंबित प्रश्नाबाबत माजी आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांच्याशी संपर्क साधला असता,त्यांनी या रस्त्याची अवस्था बिकट असल्याचे सांगत तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली. अनेक वर्षांपासून या महत्त्वाच्या रस्त्याचा प्रश्न प्रलंबित असुन प्रशासनाने व राज्य सरकारने ग्रामीण भागातील या समस्येकडे गांभीर्याने पाहून नागरिकांना दिलासा द्यावा,अशी नाराजी त्यांनी व्यक्त केली.

# तामसा येथे घरफोडीच्या घटनांनी खळबळ; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण!

### संभाजीनगर परिसरात घराचे मुख्य गेट तोडून चोरी; सोन्या-चांदीचे दागिने आणि १० हजारांची रोकड लंपास

तामसा (प्रतिनिधी)

हदगाव तालुक्यातील तामसा येथील संभाजीनगर परिसरात घरफोडीची घटना उघडकीस आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. ८ ऑक्टोबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी घराचे मुख्य गेट तोडून घरातील साहित्याची नासधूस केली. यावेळी सोन्या-चांदीचे दागिने आणि १० हजार रुपयांची रोकड चोरीला गेल्याची तक्रार शांताबाई बापुराव चंदनवार वय ६५, रा. संभाजीनगर, तामसा यांनी केली आहे.

, शांताबाई चंदनवार या आपल्या कुटुंबासह तामसा येथील संभाजीनगर परिसरात राहतात. नातीच्या शिक्षणासाठी त्यांची सून आणि नात मागील चार वर्षांपासून नांदेड येथे वास्तव्यास आहेत. त्यांचे पती बापुराव नारायणराव चंदनवार (वय ७२) हे देवदर्शनासाठी बाहेरगावी गेले असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.



दरम्यान, ८ ऑक्टोबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अंदाजे तीन ते चार अज्ञात व्यक्तींनी घराच्या मुख्य गेटची तोडफोड करून घरात प्रवेश केला. त्यानंतर मुख्य कपाटासह स्वयंपाकघरातील साहित्याची नासधूस केली. घरातील दोन खोल्यांमधील तीन कपाटांतील कपडे बाहेर फेकून देत चोरट्यांनी घरात उचकापाचक केली.

या घटनेत सुनेचा १२ ग्रॅम वजनाचा सोन्याचा नेकलेस, ३ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या कानातील वेल, पाच तोळे चांदीचे जोडवे, पाच तोळे वजनाचा चांदीचा ग्लास आणि १० हजार रुपये रोख रक्कम चोरीला गेल्याचे तक्रारीत म्हटले आहे.तेव्हा कै रवी चंदनवार ग्रामपंचायत सदस्य यांचे हे घर असून सो.शांताबाई चंदनवार यांच्या घराच्या हाकेच्या अंतरावर दयानंद चव्हाण यांच्या ही घरी चोरी झाली दयानंद चव्हाण हे संभाजीनगर या ठिकाणी काही दिवसापूर्वी गेले होते त्यांच्या ही घरी चोरी झाली या ठिकाणी नेमक्या कोणत्या वस्तू गेल्या हे स्पष्ट झाले नाही

या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, रात्रीच्या वेळी घरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तेव्हा बीट जमदार व गस्त घालणाऱ्या पोलिस अधिकारी यांच्या विषयी रोष व्यक्त करण्यात येत आहे

या प्रकरणातील अज्ञात चोरट्यांचा शोध घेऊन चोरीला गेलेले सोन्या-चांदीचे दागिने आणि रोकड परत मिळवून द्यावी, तसेच संबंधित आरोपींविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी शांताबाई चंदनवार यांनी तक्रारीद्वारे केली आहे.दरम्यान, या घटनेचा तपास करून परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. या प्रकरणी पोलिसांकडून अधिकृत माहिती मिळाल्यानंतर पुढील तपशील स्पष्ट होऊ शकतील.तेव्हा तामसा पोलिसाना संपर्क साधला असता गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू असल्याचे सांगितले आहे..

# खा राहुल गांधी, खा प्रियंका गांधी यांच्या अटकेचा अंबाजोगाईत निषेध; दुष्काळी मदतीसह विविध मागण्यांसाठी काँग्रेस आक्रमक

### उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभिजीत लोमटे यांचा सरकारवर घणाघात

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्या अटकेचा तीव्र निषेध, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत, चझडउ पेपरफुटी प्रकरणातील जबाबदारांवर कारवाई आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी अशा विविध मुद्द्यांवर अंबाजोगाई तालुका काँग्रेस कमिटीने आक्रमक भूमिका घेतली आहे. या मागण्यांचे निवेदन तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने उपजिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

यावेळी तालुकाध्यक्ष अभिजीत लोमटे यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका करत लोकशाही, शेतकरी आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी केली.राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्या अटकेचा निषेध व्यक्त करताना लोमटे म्हणाले, विरोधकांचा आवाज दाबून लोकशाही मजबूत होत नाही. जनतेच्या प्रश्नांवर सत्तेला जाब विचारणे हा विरोधी पक्षाचा अधिकार आहे. अटक करून काँग्रेसचा आवाज दाबता येईल, असा भ्रम सत्ताधाऱ्यांनी बाळगू नये. अन्यायाविरुद्धचा आमचा संघर्ष थांबणार नाही.राज्यात दुष्काळ जाहीर झालेला असतानाही शेतकऱ्यांना पुरेशी मदत मिळत नसल्याचा मुद्दा उपस्थित करत दुष्काळग्रस्त भागासाठी जाहीर केलेल्या सर्व योजनांची तातडीने अंमलबजावणी करावी, आर्थिक मदत व आवश्यक सवलती शेतकऱ्यांपर्यंत



पोहोचवाव्यात, अशी मागणी करण्यात आली. दुष्काळ जाहीर करून सरकारची जबाबदारी संपत नाही; संकटातील शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत मिळाली पाहिजे, अशी भूमिका काँग्रेसने मांडली.चझडउ पेपरफुटी प्रकरणावरही काँग्रेसने नाराजी व्यक्त केली. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच या प्रकरणाला जबाबदार असणाऱ्यांचे राजीनामे घ्यावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

याशिवाय निवडणूक प्रक्रियेच्या निष्पक्षतेबाबत उपस्थित होणाऱ्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही करण्यात आली. शेतकरी, विद्यार्थी आणि सामान्य नागरिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्यास काँग्रेस लोकशाही मार्गाने संघर्ष सुरूच ठेवेल, असा इशारा अभिजीत लोमटे यांनी दिला.

या निवेदनप्रसंगी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष वसंत मोरे, अनुसूचित विभागाचे प्रदेश सरचिटणीस संजय वाघमारे, बाबा खतीब, विद्याधर पांडे, अनंतराव देशमुख, अच्युत इंगळे, कुशावती नागरगोजे, रंजना आडे, उषा केदार, अनिल पालेकर, रावसाहेब घाडगे, प्रवीण जोगदंड, श्रीकांत देशमुख, दिनेश गंगणे यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आष्टीतील महिलांसाठी नवरात्रीत प्रथमच रंगणार तीन दिवसीय दांडिया महोत्सव

### दररोज लकी ड्रॉद्वारे २० महिलांना आकर्षक बक्षिसे;केवळ महिलांसाठी विशेष आयोजन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी शहरातील महिलांसाठी यंदाची नवरात्र खास ठरणार असून, शहरात प्रथमच तीन दिवसीय दांडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. नवरात्रोत्सवाच्या उत्साहात महिलांना दांडियाचा आनंद लुटता यावा, त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे आणि मनोरंजनासाठी स्वतंत्र संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. त्यामुळे आष्टीकर महिलांना यंदा आपल्या शहरातच दांडियाच्या तालावर ठेका धरत नवरात्रोत्सवाचा आनंद द्विगुणित करण्याची संधी मिळणार आहे.

नवरात्र म्हटले की देवीची आराधना, घटस्थापना, उपवास आणि दांडिया-गरब्याचा उत्साह असे आनंददायी वातावरण पाहायला मिळते. विशेषतः मोठ्या शहरांमध्ये नवरात्रोत्सवाच्या काळात दांडिया महोत्सवांची मोठी धूम असते. मात्र, आष्टीसारख्या शहरातील महिलांनाही अशा महोत्सवाचा आनंद आपल्या गावातच घेता यावा, या हेतूने प्रथमच या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे आष्टी शहरातील महिलांमध्ये या महोत्सवाबाबत उत्सुकता निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

हा तीन दिवसीय दांडिया महोत्सव दि. १५, १६ आणि १७ ऑक्टोबर २०२६ रोजी आराज पार्किंग ग्राउंड, आष्टी येथे आयोजित करण्यात येणार असून, दररोज सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत दांडियाचा कार्यक्रम रंगणार आहे. या महोत्सवाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे येथे केवळ महिलांनाच प्रवेश दिला जाणार आहे. महिलांना सुरक्षित आणि आनंददायी वातावरणात नवरात्रोत्सव साजरा करता यावा, या उद्देशाने आयोजकांनी ही संकल्पना राबविली आहे.

या तीन दिवसांत महिलांना पारंपरिक दांडियाच्या तालावर ठेका धरता येणार



असून, मैत्रिणींसह तसेच कुटुंबातील इतर महिलांसोबत सहभागी होऊन उत्सवाचा आनंद घेता येणार आहे. महिलांच्या मनोरंजनाबरोबरच त्यांना एकत्र येण्याची, आपले कलागुण सादर करण्याची आणि नवरात्रोत्सवातील आनंदाचे क्षण अनुभवण्याची संधी या महोत्सवाच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे.

या महोत्सवात सहभागी होणाऱ्या महिलांसाठी आकर्षक बक्षिसांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. महोत्सवाच्या प्रत्येक दिवशी लकी ड्रॉच्या माध्यमातून २० महिलांची निवड करून त्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. त्यामुळे दांडियाच्या आनंदासोबतच बक्षिसे जिंकण्याची संधीही महिलांना मिळणार आहे. आष्टी शहरात प्रथमच आयोजित करण्यात येत असलेल्या या दांडिया महोत्सवामुळे महिलांसाठी मनोरंजनाची एक वेगळी पर्वणी उपलब्ध होणार आहे. नवरात्रोत्सवाचा उत्साह वाढविणाऱ्या या उपक्रमात आष्टी शहरातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. या दांडिया महोत्सवात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या महिलांनी मनिषा चौरे, कल्पना मेहेर, मनिषा गोल्हार, वर्षा भंडारी, सायली हंबर्डे, कांचन गोल्हार, निकिता रानडे आणि अर्चना धस यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



प्रतिनिधी ,पिराजी गायकवाड परतुर

तालुक्यातील ढोकमाळ येथील वडार वस्तीचे रहिवासी श्री. भीमराव आलकुटे यांची 'मी वडार महाराष्ट्राचा' या संघटनेच्या जालना जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे ढोकमाळ वडार वस्ती परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, समाजबांधवांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

वडार समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीसाठी कार्य करण्याची संधी या नियुक्तीच्या माध्यमातून भीमराव आलकुटे यांना मिळाली आहे. समाजातील वंचित, दुर्लक्षित आणि गरजू घटकांना न्याय मिळवून देणे, तरुणांना शिक्षण व प्रगतीसाठी प्रोत्साहित करणे, तसेच समाजाच्या विविध प्रश्नांना संघटितपणे वाचा फोडणे, यांसारख्या कार्यासाठी त्यांच्या नियुक्तीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

'मी वडार महाराष्ट्राचा' संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. विजयदादा चौगुलेयांच्या नेतृत्वाखाली वडार समाजाच्या एकजुटीसाठी आणि सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्याचा प्रयत्न केला जात आहे. या संघटनेच्या माध्यमातून भीमराव आलकुटे यांच्यावर सोपविण्यात आलेली जिल्हा उपाध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्या सामाजिक वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा मानली जात आहे.

पद हे केवळ प्रतिष्ठेचे प्रतीक नसून समाजसेवेची मोठी जबाबदारी आहे,या भावनेतून भीमराव आलाकुटे यांनी समाजाच्या हितासाठी कार्य करावे, अशी अपेक्षा समाजबांधवांकडून व्यक्त होत आहे. त्यांच्या नेतृत्वातून वडार समाजाच्या विविध समस्या प्रशासनापर्यंत पोहोचतील आणि समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी संघटित प्रयत्नांना अधिक बळ मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.ढोकमाळ वडार वस्तीपासून जिल्हास्तरावरील संघटनेच्या जबाबदारीपर्यंत झालेली ही निवड परिसरासाठी अभिमानाची बाब ठरत आहे. त्यांच्या पुढील सामाजिक वाटचालीसाठी विविध स्तरांतून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# गीर गोवंश संवर्धनातून आधुनिक दुग्धव्यवसायाचा आदर्श निर्माण करा

## भोकर येथील 'अथर्व डेअरी'ची पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून पाहणी

नांदेड जिल्हा प्रतिनिधी :- आधुनिक तंत्रज्ञान, शास्त्रीय पशुसंगोपन आणि नियोजनबद्ध व्यवस्थापनाच्या माध्यमातून दुग्धव्यवसाय अधिक उत्पादनक्षम व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर करण्यासाठी प्रगतिशील पशुपालकांचे प्रयत्न महत्त्वपूर्ण ठरत आहेत. या अनुषंगाने भोकर येथील प्रगतिशील पशुपालक चंद्रकांत भगवानराव चिंचाळकर यांच्या गीर गोवंश संगोपनावर आधारित 'अथर्व डेअरी' या दुग्धव्यवसाय प्रक्षेत्राची आज पाहणी करण्यात आली.

या वेळी जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. सखाराम खुणे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. प्रविणकुमार घुले, भोकरचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अविनाश बुन्नावार उपस्थित होते.

अथर्व डेअरी प्रक्षेत्रावर गुजरात राज्यातून निवडक पद्धतीने खरेदी केलेल्या गीर गोवंशाचे संगोपन करण्यात येत आहे. गीर ही देशी गोवंशातील महत्त्वाची दुग्धोत्पादक जात असून दूध उत्पादनक्षमता, स्थानिक हवामानाशी जुळवून घेण्याची क्षमता आणि आनुवंशिक वैशिष्ट्यांमुळे या जातीला विशेष महत्त्व आहे. उत्कृष्ट आनुवंशिक गुणधर्म असलेल्या गोवंशाची निवड करून त्यांचे शास्त्रीय पद्धतीने संगोपन करण्याचा चिंचाळकर यांचा प्रयत्न उल्लेखनीय आहे.

पाहणीदरम्यान गोठ्याची रचना, जनावरांच्या मुक्त हालचालीची व्यवस्था, पशुधनाचे आरोग्य आणि चारा व्यवस्थापनाची माहिती घेण्यात आली. प्रक्षेत्रावर मुक्त संचार गोठा पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून, त्यामुळे जनावरांना मुक्तपणे हालचाल करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध होते. तसेच हिरवा व वाळलेला चारा यांचे नियोजनबद्ध व्यवस्थापन करण्यात आले आहे. जनावरांच्या पोषणविषयक गरजा लक्षात घेऊन चाऱ्याचा कार्यक्षम वापर करण्यावर भर दिल्याचे दिसून आले.




गीर गोवंशाचे संवर्धन आणि उत्कृष्ट आनुवंशिक गुणधर्म पुढील पिढीत संक्रमित करण्यासाठी चिंचाळकर यांनी भविष्यात भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे नियोजन केले आहे. या तंत्रज्ञानाचा योग्य पशुवैद्यकीय मार्गदर्शनाखाली वापर केल्यास उच्च आनुवंशिक गुणवत्तेच्या गोवंशाची पैदास वाढविण्यास आणि दुग्धोत्पादन क्षमता सुधारण्यास मदत होऊ शकते.

पारंपरिक दुग्धव्यवसायाला आधुनिक पशुसंगोपन पद्धतीची जोड देत गीर गोवंश संवर्धन, मुक्त संचार गोठा पद्धती, नियोजनबद्ध चारा व्यवस्थापन आणि आधुनिक प्रजनन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याच्या दिशेने चिंचाळकर यांनी केलेले प्रयत्न प्रेरणादायी आहेत. जिल्ह्यातील इतर शेतकरी व पशुपालकांनीही शास्त्रीय पशुसंगोपन, गुणवत्तापूर्ण गोवंशाची निवड आणि आधुनिक व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करावा. यामुळे दुग्धव्यवसाय अधिक शाश्वत, उत्पादनक्षम व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर होण्यास मदत होणार आहे.

# नांदेडच्या शेतकऱ्यांना पीकविम्याबाबत दिलासा..!

## विमा कंपनीचे अपील फेटाळले, नुकसान भरपाईसाठी तातडीने कार्यवाहीचे आदेश

नायगाव (प्रतिनिधी)

प्रधानमंत्री पीकविमा योजना खरीप हंगाम २०२३ अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाईचा प्रश्न मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीने जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीच्या आदेशाविरोधात दाखल केलेले अपील राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीने फेटाळले आहे. त्यामुळे २१ जानेवारी २०२६ रोजीच्या बैठकीतील निर्देश आणि २४ जून २०२६ रोजीचे आदेश कायम ठेवण्यात आले असून, पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

खरीप २०२३ मध्ये स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीसंदर्भात नांदेड जिल्ह्यात सुमारे दीड लाख तक्रार अर्ज प्राप्त झाले होते. कंपनीच्या अपिलात तथ्य नसल्याचे आणि वस्तुस्थितीदर्शक कागदपत्रे सादर न केल्याचे नमूद करत सचिव (कृषी) तथा राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षांनी अपील फेटाळले.

शेतकरी नेत्यांच्या पाठपुराव्याला यश..

पीकविमा नुकसानभरपाईसाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे नायगाव तालुकाध्यक्ष तथा शेतकरी नेते गजानन पाटील होटाळकर, बालाजी पाटील सांगवीकर, माधव पाटील केरूरे आणि अभय देशमुख कावळगावकर यांनी १४ ऑगस्ट २०२४ रोजी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण केले होते.

तत्कालीन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत आणि निवासी जिल्हाधिकारी महेश वडदकर यांच्याकडे त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. तसेच संभाजी ब्रिगेड शेतकरी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष संतोष गव्हाणे, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष हणमंतराव राजेगोरे पाटील आणि डॉ. रेखाताई चव्हाण यांनीही शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी सहकार्य केले.

विमा कंपनीकडून नुकसानीच्या पंचनाम्यांच्या प्रती मिळत नसल्याची तक्रार शेतकरी प्रतिनिधींनी केली होती. मुंबई येथे कृषी सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतही शेतकऱ्यांची बाजू मांडण्यात आली.

दिवाळीपूर्वी नुकसानभरपाई मिळणार का..?राज्यस्तरीय समितीने विमा कंपनीचे अपील फेटाळल्याने संबंधित शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाईचा मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा आहे. मात्र, प्रत्यक्ष रक्कम खात्यात कधी जमा होणार, हा प्रश्न कायम आहे. विमा कंपनीने विलंब न करता पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी प्रतिनिधींनी केली आहे.बळीराजाच्या हक्कासाठी आमचा लढा सुरूच राहणार! असा निर्धार शेतकरी प्रतिनिधींनी व्यक्त केला.

# बीड शहरातील कालिका नवरात्र महोत्सवाची दोन्ही ठिकाणी जय्यत तयारी

बीड : शहरातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या कालिका देवी मंदिर बलभीम चौक परिसरात नवरात्र महोत्सवाची जय्यत तयारी सुरू झाली आहे. तसेच कालिका नगर नगर रोड बीड येथे सुद्धा नवरात्रोत्सवानिमित्त मंदिराची आकर्षक विद्युत रोषणाई, फुलांची सजावट तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

नवरात्राच्या नऊ दिवसांत देवीची विशेष पूजा, आरती, होम हवन अभिषेक व धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत. या काळात देवीच्या दर्शनासाठी शहरासह परिसरातील हजारो भाविक येण्याची शक्यता असून, भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी आवश्यक नियोजन करण्यात येत आहे.

मंदिर परिसरात स्वच्छता, पिण्याचे पाणी, सुरक्षा व्यवस्था तसेच भाविकांच्या दर्शनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. नवरात्रोत्सव भक्तिमय आणि



उत्साहपूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी आयोजक व कालिंका देवी मंदिर ट्रस्ट यंत्रणांकडून तयारीला वेग आला आहे.

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने बीड शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, **जय माता दी**च्या जयघोषाने परिसर दुमदुमणार आहे.

# डेंग्यूसदृश आजाराने पाच वर्षीय चिमुकलीचा मृत्यू; तामसा गावात भीतीचे वातावरण!

तामसा (प्रतिनिधी)

)आरोग्य विभागाच्या निष्क्रियतेवर नागरिकांचा संताप; स्वच्छता आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप )आरोग्य विभागाच्या जनजागृतीचा अभाव? हदगाव तालुक्यातील तामसा येथे डेंग्यूसदृश आजारामुळे पाच वर्षे सहा महिन्यांच्या चिमुकलीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना ८ ऑक्टोबर रोजी घडली. जिन्नत सय्यद समीर असे मृत चिमुकलीचे नाव असून, तिच्यावर छत्रपती संभाजीनगर येथे उपचार सुरू होते. या घटनेमुळे तामसा गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवर नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. गावातील स्वच्छता, नालेसफाई, कचरा व्यवस्थापन आणि डास प्रतिबंधक उपाययोजनांकडे संबंधित यंत्रणांनी तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

तामसा येथील बिलालनगर परिसरात ऑटो चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे सय्यद समीर हे आपल्या कुटुंबासह वास्तव्यास आहेत. त्यांच्या पाच वर्षे सहा महिन्यांच्या जिन्नत या मुलीला अचानक ताप आल्याने सुरुवातीला तामसा येथे प्राथमिक उपचार करण्यात आले. मात्र, ताप कमी होत नसल्याने तिला पुढील उपचारांसाठी नांदेड येथील मराठवाडा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथेही तिच्या प्रकृतीत अपेक्षित सुधारणा न झाल्याने तिला छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले. मात्र, ८ ऑक्टोबर रोजी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. या घटनेने सय्यद कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



यापूर्वीही चिमुकल्याचा मृत्यू झाल्याचा दावा

तामसा गावात डेंग्यूसदृश आजाराचे रुग्ण वाढत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. काही दिवसांपूर्वी प्रभाग क्रमांक पाचमधील कोरे कुटुंबातील चार वर्षीय मुलाचाही अशाच आजाराने मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे. याशिवाय, अनेक पालकांना आपल्या लहान मुलांना उपचारांसाठी नांदेड येथील शासकीय रुग्णालयात तसेच खासगी रुग्णालयांत घेऊन जावे लागत असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.

सय्यद कुटुंबातील नागरिकांच्या म्हणण्यानुसार, तामसा परिसरात डेंग्यूमुळे मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या वाढेल का असा ही प्रश्न निर्माण केला आहे  मात्र, या मृत्यूंचे अधिकृत वैद्यकीय निदान आणि डेंग्यूमुळे झालेल्या मृत्यूंची संख्या आरोग्य विभागाने तपासून स्पष्ट करणे आवश्यक आहे.तामसा गावात ताप, हिवताप, डेंग्यू आणि गॅस्ट्रो यांसारख्या आजारांचा प्रादुर्भाव  चालू असुन आरोग्य विभागाकडून पुरेशी जनजागृती केली जात नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. आरोग्य कर्मचारी आणि परिचारिका नियमितपणे गावात भेट देत नसल्याचीही तक्रार स्थानिकांकडून केली जात आहे.

डेंग्यूचा प्रसार रोखण्यासाठी नागरिकांना आवश्यक माहिती देणे, तापाच्या रुग्णांचे सर्वेक्षण करणे, संशयित रुग्णांची तपासणी करणे, डासांची उत्पत्तीस्थळे नष्ट करणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे गरजेचे आहे. मात्र, या उपाययोजना प्रभावीपणे राबविल्या जात नसल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

नालेसफाई आणि कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न ऐरणीवर

तामसा ग्रामपंचायत हद्दीत नालेसफाई नियमित होत नसल्याचा तसेच कचरा वेळेवर उचलला जात नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. साचलेले पाणी आणि अस्वच्छ परिसरामुळे डासांची उत्पत्ती होण्यास पोषक परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे ग्रामपंचायत आणि आरोग्य विभागाने संयुक्तपणे स्वच्छता मोहीम राबवून गावातील संभाव्य डास उत्पत्तीस्थळे तातडीने नष्ट करावीत,आणि

गावातील घनकचरा व्यवस्थापन आणि वित्त आयोगाच्या निधीतून स्वच्छतेसाठी करण्यात येणाऱ्या खर्चाबाबतही नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. ग्रामपंचायतीला विविध योजनांतून निधी उपलब्ध होत असताना प्रत्यक्षात स्वच्छतेची परिस्थिती समाधानकारक का नाही, असा सवाल उपस्थित केला जात आहे. संबंधित निधीचा विनियोग, प्रत्यक्ष कामे आणि त्यांच्या गुणवत्तेची चौकशी करण्याची मागणीही होत आहे.

प्रशासकांसह आरोग्य यंत्रणेने तातडीने लक्ष द्यावे

चिमुकलीच्या मृत्यूमुळे गावातील नागरिकांमध्ये चिंता वाढली असून, संभाव्य आजाराचा प्रसार रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. आरोग्य विभागाने गावात विशेष आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करावे, तापाच्या रुग्णांचे सर्वेक्षण करावे, आवश्यकतेनुसार रक्तनमुने तपासणीसाठी घ्यावेत आणि डेंग्यू प्रतिबंधाबाबत जनजागृती करावी. तसेच ग्रामपंचायतीने नालेसफाई, कचरा संकलन आणि डास प्रतिबंधक उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

या प्रकरणी संबंधित आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे आरोग्य विभागाची अधिकृत भूमिका समजू शकली नाही.

# करपलेले सोयाबीन मोसंबीच्या बागा विहिरी कोरड्या

जालना शेख फारुक :- पावसाने पाठ फिरवल्याने शेतातील पिके करपू लागली मोसंबीच्या बागा पाण्याअभावी होरपळत आहेत तर विहिरी आणि शेततळी कोरडी पडल्याने शेतीसमोरील संकट अधिक गडद झाले आहे.या दुष्काळसदृश परिस्थितीची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथकाने गुरुवारी दि.९ ऑक्टोबर जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील नाणेगाव तसेच अंबड तालुक्यातील किणगाववाडी आणि जामखेड परिसरातील शेतशिवारांची प्रत्यक्ष पाहणी केली.शेतकऱ्यांशी संवाद साधत पिकांची सद्यस्थिती पाण्याची उपलब्धता आणि संभाव्य नुकसानीची माहिती घेण्यात आली.आता या पाहणीच्या आधारे केंद्रीय पथक शासनाला कोणता अहवाल सादर करते आणि संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना कितपत दिलासा मिळतो याकडे लक्ष लागले आहे.शेतशिवारात पिकांची दयनीय अवस्था केंद्रीय पथकाने बदनापूर तालुक्यातील नाणेगाव येथे शेतकरी शिवाजी डोंगरे यांच्या शेतातील करपलेल्या सोयाबीन पिकाची पाहणी केली. पावसाअभावी पिकांच्या वाढीवर झालेला परिणाम आणि संभाव्य उत्पादनातील घट याबाबत माहिती घेण्यात आली.

अंबड तालुक्यातील किणगाववाडी येथे शेतकरी उदल हरीचंद शिहिरे यांच्या शेतातील करपलेली मोसंबीची झाडे आणि कोरडे पडलेले शेततळे पाहून पथकाने परिस्थितीचा आढावा घेतला. याच परिसरात शिवलाल गांगे यांच्या शेतातील अदरक तर बालचंद गांगे यांच्या शेतातील कापूस पिकाची पाहणी करण्यात आली.जामखेड येथे शेतकरी संतोष गुरुके यांच्या शेतातील बाजरी पिकाची आणि गणेश जुंजार यांच्या शेतातील कोरड्या विहिरीची पाहणी करण्यात आली. पावसातील खंड जमिनीतील ओलावा कमी होणे आणि सिंचनासाठी पाणी उपलब्ध नसणे यामुळे शेतीवर निर्माण झालेल्या संकटाची माहिती पथकाने घेतली.गल्हाटी प्रकल्प कोरडा १०६ कुटुंबांच्या उपजीविकेचा प्रश्न

अंबड तालुक्यातील कोरड्या पडलेल्या गल्हाटी मध्यम प्रकल्पाचीही केंद्रीय पथकाने पाहणी केली.या प्रकल्पावर अवलंबून असलेल्या गावांच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न सिंचनासाठी घटलेली पाण्याची उपलब्धता आणि मच्छीमारीवर उपजीविका करणाऱ्या १०६ कुटुंबांसमोरील अडचणी पथकाच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या.प्रकल्प परिसरातील उत्तमराव साळुंके यांच्या शेतातील कापूस तसेच अन्य शेतांमधील ऊस पिकांची पाहणी करून पिकांच्या सद्यस्थितीची माहिती घेण्यात आली.प्रकल्प कोरडा पडल्याने पाणीटंचाईचे संकट केवळ शेतकऱ्यांपुरते मर्यादित नसून त्यावर अवलंबून असलेल्या गावांच्या पाणीपुरवठ्यावर आणि संबंधित कुटुंबांच्या उपजीविकेवरही त्याचे परिणाम होत असल्याचे या पाहणीतून समोर आले.

शेतकऱ्यांनी मांडल्या अडचणी

पाहणीदरम्यान केंद्रीय पथकाने शेतकऱ्यांशी संवाद साधून पर्जन्यमान पावसातील खंड पिकांच्या वाढीची स्थिती उत्पादन खर्च आणि सिंचनासाठी उपलब्ध असलेल्या पाण्याबाबत सविस्तर माहिती घेतली. पिकांचे नुकसान वाढता शेती खर्च आणि प्रतिकूल हवामानामुळे निर्माण झालेल्या अडचणी शेतकऱ्यांनी पथकासमोर



मांडल्या.दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.पीक नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करून नुकसानभरपाई व आवश्यक आर्थिक मदत द्यावी तसेच पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.

वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती कृषी व शेतकरी कल्याण विभागाचे संयुक्त सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील या केंद्रीय पथकात महालनोबिस राष्ट्रीय पीक पूर्वानुमान केंद्राचे उपसंचालक सुनील कुमार दुबे,नीती आयोगाचे सल्लागार डॉ.जसपाल सिंग आणि पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या पशुधन अधिकारी डॉ.साक्षी भदौरिया यांचा समावेश होता.यावेळी आमदार नारायण कुचे, राज्याच्या कृषी विभागाचे सचिव परिमल सिंग, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल,निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल,छत्रपती संभाजीनगर विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे,जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे,जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रशांत चौधरी,बदनापूर उपविभागीय अधिकारी लता बागुल आणि घनसावंगी-अंबड उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी उपस्थित होते.कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील पर्जन्यमान,पीक परिस्थिती आणि दुष्काळसदृश स्थितीबाबत पथकाला माहिती दिली.प्रत्यक्ष शेतशिवारातील पाहणी आणि शेतकऱ्यांशी झालेल्या संवादाच्या आधारे केंद्रीय पथक शासनाला अहवाल सादर करणार आहे.त्यामुळे या अहवालातून जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचे नेमके चित्र कितपत स्पष्ट होते आणि शेतकऱ्यांच्या मदतीसाठी कोणते निर्णय घेतले जातात याकडे जिल्ह्यातील शेतकरीवर्गाचे लक्ष लागले आहे.

# स्पायर फाउंडेशन चा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मुख्याध्यापक साईनाथ बोडखे यांना जाहीर

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) स्पायर फाउंडेशन चा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मुख्याध्यापक श्री. साईनाथ बोडखे यांना जाहीर झाला असून पुरस्काराचे वितरण रविवार, दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी संजिवनी बँक्केट हॉल, नांदूर नाका, नाशिक येथे आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात सुदर्शन विद्यालय, सांगवी (पाटण), ता. आष्टी, जि. बीड येथील आदर्श मुख्याध्यापक श्री. साईनाथ कारभारी बोडखे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ ने सन्मानित करण्यात येणार आहे.



श्री. साईनाथ कारभारी बोडखे हे एम.ए., बी.एड. शिक्षित असून त्यांनी आपल्या तब्बल ३२ वर्षांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. आनंददायी शिक्षण पद्धतीचा प्रभावी वापर, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आणि शाळेच्या शैक्षणिक प्रगतीसाठी त्यांनी दिलेले योगदान याची पुरस्कारासाठी विशेष दखल घेण्यात आली आहे.

सुदर्शन विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल सलग तीन वर्षे १०० टक्के लागला असून, या उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरीत मुख्याध्यापक श्री. साईनाथ बोडखे यांचे मार्गदर्शन आणि नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरले आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबरोबरच शाळेतील विविध उपक्रमांना त्यांनी प्रोत्साहन दिले आहे. शैक्षणिक कार्यासोबतच वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाला त्यांनी विशेष महत्त्व दिले आहे. सुदर्शन विद्यालयाच्या परिसरात १०० हून अधिक मोठी झाडे जोपासण्यात आली आहेत. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी, यासाठी विविध पर्यावरणपूरक उपक्रमही राबविण्यात आले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शालेय पोषण आहार मिळावा, यासाठीही त्यांनी विशेष लक्ष दिले आहे.

शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, पर्यावरण संवर्धन, शालेय व्यवस्थापन आणि विद्यार्थीहिताच्या विविध उपक्रमांमध्ये दिलेल्या योगदानाची दखल घेत त्यांची राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. ३२ वर्षांची प्रामाणिक, गुणवत्तापूर्ण आणि विद्यार्थीहिताची शैक्षणिक सेवा, सलग तीन वर्षांचा १०० टक्के दहावीचा निकाल, पर्यावरण संवर्धनासाठी केलेले कार्य आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेले प्रयत्न यांचा गौरव म्हणून श्री. साईनाथ कारभारी बोडखे यांना मिळालेला हा पुरस्कार त्यांच्या शैक्षणिक कार्याची विशेष पावती मानली जात आहे. त्यांच्या या निवडीबद्दल सांगवी (पाटण), आनंदवाडी-सराटेवडगाव परिसरातील शैक्षणिक, सामाजिक आणि विविध क्षेत्रांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.